## सुविचार

खरी मैत्री म्हणजे सुखात टाळ्या वाजवणं नाही, तर दुःखात शांतपणे हात धरून उभं राहणं; कारण शब्दांपेक्षा साथ महत्त्वाची असते आणि विश्वास हाच मैत्रीचा खरा पाया असतो.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...


## प्रदूषण नियंत्रणात अपयश

**मुंबई :** मुंबई, नवी मुंबईतील प्रदूषण नियंत्रणात आणण्याकामी अपयशी ठरलेल्या पालिका प्रशासनांच्या कारभारावर उच्च न्यायालयाने नाराजी व्यक्त केली. प्रदूषण नियंत्रणासंदर्भातील उपाययोजनांवर देखरेख तसेच विविध शिफारशी करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समिती स्थापण्याचा निर्णय न्यायालयाने घेतला. प्रदूषण कमी झाले नसून प्रशासनांची उदासिनता यातून दिसून येत असल्याचे न्यायालयाने म्हटले.


आरएनआय : MAHMAR/2021/85884 | शनिवार, दि. ३१ जानेवारी, २०२६ | वर्ष - १ | अंक - १२८ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### तृणमूल काँग्रेस 'घुसखोर समर्थक'

**नवी दिल्ली :** पश्चिम बंगालमधील तृणमूल काँग्रेस सरकारच्या "घुसखोर समर्थक" धोरणांमुळे राष्ट्रीय सुरक्षा धोक्यात आली आहे, असा आरोप भाजपने केला आणि विधानसभा निवडणुकीत सत्तेत आल्यास परिस्थिती सुरळीत करण्यासाठी आणि विकास सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक उपाययोजना केल्या जातील, असे प्रतिपादन केले. सुधांशू त्रिवेदी म्हणाले की, भारत-बांगलादेश सीमेवर कुंपण घालण्यासाठी आधीच अधिग्रहित केलेली जमीन बीएसएफला देण्याचे राज्य सरकारला गुरुवारी दिलेल्या निर्देशामुळे तृणमूल काँग्रेसचे धोरण "उघड" झाले आहे.

### सहारनपूरमध्ये ड्रग्ज तस्कराला अटक

**सहारणपूर (उत्तर प्रदेश) :** उत्तर प्रदेशातील सहारणपूर जिल्ह्यात एका संशयित ड्रग्ज तस्कराला अटक करण्यात आली आणि त्याच्या ताब्यातून सुमारे १.४० कोटी रुपयांचे स्मॅक जप्त करण्यात आले, असे पोलिसांनी शुक्रवारी सांगितले. 'ऑपरेशन सवेरा' अंतर्गत ही अटक करण्यात आली आहे, ज्याअंतर्गत अंमली पदार्थांची तस्करी आणि विक्री रोखण्यासाठी विभागातील तिन्ही जिल्ह्यांमध्ये तपासणी आणि गस्त मोहीम राबविली जात आहे, असे सर्कल ऑफिसर गंगोह अशोक सिसोदिया यांनी सांगितले.

### चार नक्षलवाद्यांचे आत्मसमर्पण

**सुकमा :** छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यात शुक्रवारी आठ लाख रुपयांचे बक्षीस असलेले दोन महिलांसह चार नक्षलवादी त्यांच्या शस्त्रांसह आत्मसमर्पण केले, असे एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने सांगितले. माओवाद्यांच्या दक्षिण बस्तर विभागाच्या किस्ताराम क्षेत्र समितीशी संबंधित असलेले हे कार्यकर्ते राज्याच्या 'पूना मार्गेम (पुनर्वसन ते सामाजिक पुनर्एकात्मता) उपक्रमांतर्गत येथे आत्मसमर्पण केले.

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या विधिमंडळाची आज मुंबईत बैठक

# सुनेत्रा अजित पवार उपमुख्यमंत्री!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** अजित पवार यांच्या निधनानंतर महाराष्ट्राच्या राजकारणात एक ऐतिहासिक वळण आले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या विधीमंडळ पक्षनेतेपदी आणि राज्याच्या उपमुख्यमंत्री पदी सुनेत्रा पवार यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले असून, त्यांनी या पदासाठी आपला होकार दिला असल्याची माहिती समोर आली आहे. या निर्णयामुळे महाराष्ट्राच्या इतिहासात पहिल्यांदाच एका महिलेला उपमुख्यमंत्री पदाचा मान मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

शुक्रवारी (दि. ३०) दुपारी बारामतीतील 'सहयोग' या निवासस्थानी एक अत्यंत महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीला सुनेत्रा पवार, पार्थ पवार, जय पवार यांच्यासह राष्ट्रवादीचे प्रसिद्धी प्रमुख नरेश अरोरा उपस्थित होते. या बैठकीत झालेल्या चर्चेनंतर सुनेत्रा पवार यांनी राज्याची जबाबदारी स्वीकारण्यास संमती दर्शवली. यानंतर नरेश अरोरा हा सकारात्मक निरोप घेऊन तातडीने मुंबईकडे रवाना झाले असून, ते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राष्ट्रवादीच्या वरिष्ठ नेत्यांना याबाबत माहिती देणार असल्याचे समजते आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, राष्ट्रवादी काँग्रेसच्या ४१ आमदारांचा सुनेत्रा पवार यांच्या नावाला पूर्ण पाठिंबा असून तसे अधिकृत पत्र राज्यपालांना दिले जाणार आहे. सर्व काही ठरल्याप्रमाणे पार पडल्यास उद्याच शनिवारीच (दि. ३०) सुनेत्रा पवार यांचा शपथविधी पार पडू शकतो. सध्या राष्ट्रवादीचे पाच प्रमुख नेते व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे मंत्रिमंडळ विस्तार आणि खात्यांच्या वाटपाबाबत चर्चा करत आहेत. प्रफुल्ल पटेल आणि देवेंद्र फडणवीस यांच्यातही आज रात्री उशिरा महत्त्वाची बैठक होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने शनिवारी विधिमंडळ पक्षाची महत्त्वाची बैठक बोलावली आहे. पक्षाचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, "सुनेत्रा पवार यांचे नाव विधिमंडळ नेतेपदासाठी चर्चेत आहे. उद्याच्या बैठकीनंतर त्यांच्याशी चर्चा करून अंतिम निर्णय घेतला जाईल. सर्व आमदारांची भावना लक्षात घेऊन पुढील पाऊल टाकले जाईल."

अजित पवार यांच्या निधनानंतर राष्ट्रवादीसमोर दोन महत्त्वाची पदे रिक्त झाली आहेत. पक्षाचे नेतृत्व आणि राज्याचे उपमुख्यमंत्रिपद. या दोन्ही जबाबदाऱ्या कोणाकडे द्यायच्या, यावरून पक्षात विचारमंथन सुरू आहे.

### सुनेत्रा पवार यांच्या नावावर होणार हा विक्रम

● सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेताच त्यांच्या नावावर एक मोठा विक्रम होणार आहे. त्या महाराष्ट्राच्या पहिला महिला उपमुख्यमंत्री असणार आहेत. या आधी कोणत्याही महिलेने या पदावर काम केलेले नाही. पवार घराण्याचा राजकीय वारसा पुढे चालवण्याचे काम आता त्या करणार आहेत. संपूर्ण राज्यातून उपमुख्यमंत्री पदासाठी सुनेत्रा पवार यांना उपमुख्यमंत्री बनवण्याची मागणी करण्यात येत होती, त्यानंतर आता त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले आहे.

## बजेट मध्ये पेट्रोल-डिझेल दरकपातीचे संकेत

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** केंद्रीय अर्थसंकल्प २०२६च्या पार्श्वभूमीवर पेट्रोल आणि डिझेलच्या किमती कमी होण्याची शक्यता पुन्हा चर्चेत आली आहे. कच्च्या तेलाच्या आंतरराष्ट्रीय बाजारातील दर सध्या तुलनेने स्थिर व कमी पातळीवर असल्याने केंद्र सरकार उत्पादन शुल्कात कपात करण्याचा विचार करू शकते, असे संकेत मिळत आहेत. मात्र, याबाबत अद्याप अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही.

सूत्रांच्या माहितीनुसार, पेट्रोलियम मंत्रालय आणि वित्त मंत्रालय जागतिक कच्च्या तेलाच्या दरांचा तसेच देशांतर्गत महसुलावर होणाऱ्या परिणामांचा आढावा घेत आहेत. उद्योग संघटनांनीही सरकारकडे पेट्रोल-डिझेलवरील करभार कमी करण्याची मागणी केली असून, यामुळे महागाई नियंत्रणात राहण्यास आणि ग्राहक खर्च वाढण्यास मदत होईल, असा त्यांचा युक्तिवाद आहे. सध्या पेट्रोल आणि डिझेलच्या किमतींमध्ये केंद्र व राज्य सरकारांचे कर मोठा वाटा उचलतात. कच्च्या तेलाच्या दरात घट होऊनही किरकोळ दरांमध्ये अपेक्षित कपात न झाल्याने सामान्य नागरिकांमध्ये नाराजी आहे. याच पार्श्वभूमीवर अर्थसंकल्पात उत्पादन शुल्कात काही प्रमाणात सवलत देण्यात येऊ शकते, अशी शक्यता तज्ज्ञ व्यक्त करत आहेत.

## अजित पवार यांचे स्मारक उभारा; महेश लांडगेंचे पालिकेला पत्र

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** भाजप आमदार महेश लांडगे यांनी आता दिवंगत अजित पवार यांच्या स्मारक उभारणीसाठी पुढाकार घेतला आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या नव्या प्रशासकीय इमारतीच्या आवारात अजित पवार यांचे ब्राँझ धातूचे स्मारक उभारण्यात यावे, अशी मागणी त्यांनी महापालिका प्रशासनाकडे केली आहे.

चिंचवड येथे पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या नव्या प्रशासकीय इमारतीचे काम सुरू आहे. या इमारतीच्या समोरील परिसरात स्वर्गीय अजित पवार यांचे भव्य स्मारक उभारून 'अजित सृष्टी' साकारावी, अशी संकल्पना आमदार लांडगे यांनी मांडली आहे. अजित पवार यांनी पिंपरी-चिंचवड शहराच्या विकासासाठी मोठे योगदान दिले असून, त्यांच्या कार्याची आणि विचारांची जपणूक होणे ही शहरवासीयांची जबाबदारी असल्याचे लांडगे यांनी नमूद केले आहे. पालिका प्रशासन या प्रस्तावावर सकारात्मक निर्णय घेईल, असा विश्वास व्यक्त करत या मागणीसाठी पाठपुरावा करणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे, असे सांगण्यात आले आहे.

दरम्यान, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या निवडणुकांच्या काळात अजित पवार आणि आमदार महेश लांडगे यांच्यात तीव्र आरोप-प्रत्यारोप झाले होते. त्या काळात लांडगे यांनी केलेल्या काही वक्तव्यांमुळे वाद निर्माण झाला होता आणि भाजपच्या वरिष्ठ नेतृत्वानेही अप्रत्यक्ष नाराजी व्यक्त केल्याची चर्चा होती.

## महाराष्ट्रातील विविध भागांत दर्शनासाठी पाठवणार

# अजित पवार यांच्या अस्थिंचे नीरा नदीत विसर्जन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** विमान अपघातात निधन झालेल्या अजित पवार यांचे आज तिसऱ्या दिवशी धार्मिक विधींनुसार अस्थी संकलन आणि विसर्जन करण्यात आले. विद्या प्रतिष्ठानच्या मैदानावर पार पडलेल्या या कार्यक्रमात पुत्र पार्थ पवार आणि जय पवार यांनी विधीपूर्वक अस्थी संकलित केल्या. या वेळी ज्येष्ठ नेते शरद पवार, अजित पवारांचे थोरले बंधू श्रीनिवास पवार, चुलत भाऊ राजेंद्र पवार, रणजित पवार, आमदार रोहित पवार यांच्यासह संपूर्ण पवार कुटुंब उपस्थित होते.



अस्थी सावडण्याच्या विधीदरम्यान शरद पवार आणि नातवांमधील जिव्हाळ्याचा क्षण भावनिक ठरला. विधी सुरू असतानाच शरद पवार दाखल झाले. पार्थ पवारांनी त्यांना थांबवून अस्थी सोबत घेऊन चौथऱ्यावरून खाली येत त्यांच्याजवळ दिल्या. शरद पवारांनी थरथरत्या हातांनी सावडण्याचा विधी पूर्ण केला.

आज सकाळी अजित पवारांच्या अस्थी पाच मंगल कलशांमध्ये विभागण्यात आल्या. यापैकी एक कलश त्यांच्या मूळ गावी काटेवाडी येथे ठेवण्यात येणार आहे. एका कलशातील अस्थींचे विसर्जन कऱ्हा-नीरा नदीच्या संगमावर करण्यात आले. यासाठी संपूर्ण पवार कुटुंब नदीकिनारी उपस्थित होते आणि सर्वांनी एकाच बोटीतून विसर्जन विधी केला.

अजित पवारांना झाडांवर विशेष प्रेम असल्याने एका कलशातील अस्थी विद्या प्रतिष्ठानच्या परिसरातील झाडांच्या मुळांशी विखुरल्या जाणार आहेत. उर्वरित दोन कलशांमधील अस्थींचे विसर्जन प्रयागराज येथील त्रिवेणी संगमावर करण्यात येणार असून, काही अस्थी महाराष्ट्रातील विविध भागांत दर्शनासाठी पाठवण्यात येणार आहेत. अजित पवार यांच्या निधनानंतर संपूर्ण राज्यात शोककळा पसरली असून, तीन दिवसांनंतर कुटुंबीयांनी सावडण्याचा विधी पूर्ण केला.

# अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे मुख्यालय पनवेलमध्ये!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील सुशिक्षित बेरोजगार तरुणांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, शेतीपूरक व्यवसाय, लघुउद्योग, वाहतूक, प्रक्रिया, विपणन व साठवणूक क्षेत्रासाठी अर्थसहाय्य करणे, तसेच मराठा समाजाचा उद्योग–व्यवसायातील सहभाग वाढवणे या उद्देशाने स्थापन झालेल्या अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे मुख्यालय आता पनवेलमध्ये उभारण्यात येणार आहे. यासाठी राज्य शासनाने एक रुपया प्रति चौरस मीटर या नाममात्र दराने ६,००० चौरस मीटरचा भूखंड नियोजन विभागाकडे वर्ग केला आहे.

शुक्रवारी महाराष्ट्र शासनाचे कार्यासन अधिकारी लक्ष्मीकांत जाधव यांनी जारी केलेल्या शासन निर्णयानुसार, पनवेल पश्चिम येथील सेक्टर १६, भूखंड क्रमांक ८ मधील एकूण ६,००० चौ. मी. क्षेत्र महामंडळाच्या मुख्यालय व बहुउद्देशीय इमारतीसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहे. हा भूखंड चटई क्षेत्र निर्देशांकासह नियोजन विभागाकडे देण्यात आला असून, सिडको महामंडळाशी समन्वय साधून आवश्यक कारवाई करण्याचे निर्देश नियोजन विभागाला देण्यात आले आहेत. तसेच सिडकोने सदर मुक्त क्षेत्र राज्य शासनाच्या नियोजन विभागाकडे तातडीने हस्तांतरित करावे, असेही आदेश देण्यात आले आहेत.

राज्यात माहितीचे सरकार तसेच त्याआधीच्या युती सरकारच्या काळात कै. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली होती. जिल्हा पातळीवर काही कार्यालये कार्यरत असली, तरी महामंडळाची स्वतंत्र मुख्यालय इमारत नव्हती. त्यामुळे स्वतंत्र इमारत उभारण्याची मागणी मराठा समाजासह महामंडळाच्या अध्यक्षांकडून सातत्याने करण्यात येत होती. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाची स्थापना कंपनी कायदा अधिनियम १९५६ अंतर्गत करण्यात आली असून, शासन निर्णय २०२० नुसार महामंडळाचे संपूर्ण कामकाज कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाकडून नियोजन विभागाकडे हस्तांतरित करण्यात आले आहे. महामंडळाच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील सुशिक्षित बेरोजगार तरुणांना स्वयंरोजगारासाठी अर्थसहाय्य, व्याज परतावा, तसेच नव्या उद्दिष्टांनुसार मार्गदर्शन व प्रशिक्षण देण्यात येत आहे. मात्र, स्वतंत्र इमारतीच्या अभावामुळे कामकाजात अडचणी येत होत्या. मुख्यालयासाठी पनवेल येथे भूखंड उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे लवकरच पनवेलमध्ये अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाची भव्य आणि सुसज्ज इमारत उभी राहणार आहे.

### कुवेत–दिल्ली विमानाचे आपत्कालीन लँडिंग

**अहमदाबाद :** कुवेतहून दिल्लीकडे जाणाऱ्या इंडिगो एअरलाइन्सच्या एका विमानाला शुक्रवारी बॉम्बच्या धमकीमुळे अहमदाबाद विमानतळावर आपत्कालीन लँडिंग करावे लागले. विमानातील टिश्यू पेपरवर बॉम्बस्फोट आणि अपहरणाची धमकी लिहिलेली आढळून आल्यानंतर वैमानिकाने तत्काळ हवाई वाहतूक नियंत्रण कक्षाला माहिती दिली आणि खबरदारीचा उपाय म्हणून विमान अहमदाबादकडे वळवण्यात आले. या विमानात एकूण १८० प्रवासी होते. लँडिंगनंतर सर्व प्रवाशांना सुरक्षितपणे विमानातून बाहेर काढण्यात आले. सुरक्षा यंत्रणांनी विमान, प्रवासी यांची सखोल तपासणी केली.

# विमान अपघाताची सीआयडी चौकशी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. अपघातामागील नेमकी कारणे शोधण्यासाठी ही चौकशी गुन्हे अन्वेषण विभागामार्फत करण्यात येणार आहे. या अनुषंगाने बारामती पोलिसांना अपघातस्थळी कोणालाही प्रवेश न देण्याच्या स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत.



बुधवारी (२८ जानेवारी) झालेल्या विमान दुर्घटनेत उपमुख्यमंत्री जित पवार यांचे दुर्दैवी निधन झाले. गुरुवारी अत्यंत शोकाकूल वातावरणात शासकीय इतमामात त्यांना अखेरचा निरोप देण्यात आला. विद्या प्रतिष्ठानच्या प्रांगणात झालेल्या अंत्यसंस्कारावेळी चिरंजीव पार्थ पवार आणि जय पवार यांनी पार्थिवाला मुखाग्नी दिला. दरम्यान, या अपघाताच्या तपासाबाबत महत्त्वाची माहिती समोर आली आहे. राज्य सरकारने ही चौकशी सीआयडीकडे सोपवली असून, बारामती पोलीस ठाण्यात नोंद असलेल्या अपघाती मृत्यू अहवालाच्या आधारे तपास केला जाणार आहे. याआधीच फॉरेन्सिक पथकाने अपघातस्थळी भेट देत विविध नमुने तपासणीसाठी गोळा केले आहेत.

२८ जानेवारी रोजी सकाळी ८.१८ वाजता हे विमान प्रथमच बारामती एअर ट्रॅफिक कंट्रोलच्या संपर्कात आले. त्या वेळी वैमानिकांना वाऱ्याचा वेग कमी असून दृश्यमानता सुमारे ३,००० मीटर असल्याची माहिती देण्यात आली. पायलटने विमान रनवे क्रमांक ११ च्या दिशेने येत असल्याचे सांगितले; मात्र रनवे स्पष्ट दिसत नसल्याचेही त्यांनी कळवले होते. रनवे दिसल्यानंतर माहिती देतो, असे पायलटने एटीसीला सांगितले होते. सकाळी ८.४३ वाजता रनवे क्रमांक ११ लँडिंगसाठी पूर्णतः सज्ज करण्यात आला. मात्र त्यानंतर पायलटकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. काही क्षणांतच धावपट्टीच्या डाव्या बाजूला अचानक ज्वाळा आणि धुराचे लोट उठताना दिसले, अशी माहिती एटीसीवर कार्यरत अधिकाऱ्याने दिली आहे. या संपूर्ण घटनेचा तपशीलवार तपास आता सीआयडीकडून करण्यात येणार आहे.

## ब्रिक्सची नवी डिजिटल पेमेंट प्रणाली; ट्रम्प यांची चिंता वाढण्याची शक्यता

# अमेरिकी डॉलरला डिजिटल प्रणालीचे थेट आव्हान

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** ब्रिक्स देशांची वाढती आर्थिक ताकद अमेरिकेसाठी कायमच चिंतेचा विषय राहिली आहे. भारत, रशिया आणि चीन यांच्या नेतृत्वाखालील या गटावर माजी अमेरिकन अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अनेक वेळा टीका केली आहे. यामागील प्रमुख कारण म्हणजे डॉलरवरील अवलंबित्व कमी करण्याचा ब्रिक्सचा प्रयत्न.




आता या दिशेने ब्रिक्स देशांनी एक ठोस पाऊल टाकले असून, नवीन सामायिक डिजिटल पेमेंट प्रणाली विकसित करण्यावर काम सुरू केले आहे.

यावर्षी ब्रिक्स शिखर परिषद भारतात होणार असून, या पार्श्वभूमीवर डॉलरला पर्याय निर्माण करण्याबाबत चर्चा अधिक तीव्र झाली आहे. याआधी ब्रिक्सचे स्वतंत्र चलन आणण्याच्या चर्चा झाल्या होत्या, मात्र आता स्पष्ट झाले आहे की हा गट नवे चलन न आणता, विद्यमान डिजिटल चलनांना जोडणारी पेमेंट प्रणाली उभारण्याच्या तयारीत आहे. अहवालानुसार, या नव्या प्रणालीद्वारे भारताचे ई-रुपे, चीनचे डिजिटल युआन आणि रशियाचे डिजिटल रूबल यांसारखी मध्यवर्ती बँकांची डिजिटल चलने एका समान तांत्रिक प्लॅटफॉर्मवर जोडली जातील. प्रत्येक देशाला आपल्या चलनावर पूर्ण नियंत्रण राहणार असून, या प्रणालीमुळे केवळ परस्पर व्यवहार सुलभ होतील. परिणामी, ब्रिक्स देशांमधील व्यापार थेट त्यांच्या डिजिटल चलनांत होऊ शकेल आणि डॉलर किंवा स्विफ्ट सारख्या डॉलर-आधारित प्रणालींची गरज कमी होईल.

या संपूर्ण मॉडेलच्या मांडणीत भारताची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. भारताने नेहमीच स्वतंत्र चलन तयार करण्यापेक्षा पेमेंट प्रणालींचे एकत्रीकरण अधिक व्यवहार्य असल्याचे मत मांडले आहे. भारताचा यूपीआय अनुभव यामागे आधार ठरतो. रशियासोबत रुपयांत व्यापार करताना निर्माण झालेल्या अडचणी लक्षात घेता, बहुपक्षीय प्रणालीमुळे अशा समस्या टाळता येतील, असेही तज्ज्ञांचे मत आहे.

ही प्रणाली दोन प्रमुख तांत्रिक घटकांवर आधारित असेल. यात सेटलमेंट सायकल: व्यवहार तात्काळ सेटल न करता ठराविक कालावधीनंतर आयात-निर्यात खात्यांचा फरक भरला जाईल, त्यामुळे निधीची गरज आणि खर्च कमी होईल. आणि फॉरेक्स स्वॅप लाइन: एखाद्या देशाला तात्पुरते दुसऱ्या देशाच्या चलनाची गरज भासल्यास, मध्यवर्ती बँका परस्पर चलनांची देवाणघेवाण करून संतुलन राखू शकतील. यांचा समावेश असेल.

रशियाला स्विफ्ट प्रणालीतून वगळणे आणि सुमारे ३०० अब्ज डॉलरची मालमत्ता गोठवणे ही घटना अनेक देशांसाठी धोक्याची घंटा ठरली. इराण, उत्तर कोरिया आणि क्युबा यांच्याविरोधात यापूर्वी झालेल्या कारवायांनंतर आता मोठ्या अर्थव्यवस्थांनाही अशा निर्बंधांचा सामना करावा लागू शकतो, याची जाणीव ब्रिक्स देशांना झाली आहे. त्यामुळे भविष्यातील संकटातही व्यापार सुरळीत चालावा, यासाठी ब्रिक्स डिजिटल पेमेंट प्रणाली एक सुरक्षित पर्याय ठरू शकते.

## इराणवर मोठ्या हल्ल्याची अमेरिकेची धमकी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**वॉशिंग्टन :** अमेरिकेने इराणवर यापूर्वी केलेल्या 'मिडनाईट हॅमर' हल्ल्यापेक्षा अधिक व्यापक आणि तीव्र कारवाई करण्याचा इशारा दिला आहे. माजी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी स्वतः ही धमकी देत, अमेरिकन लष्करी काफिला इराणच्या दिशेने रवाना झाल्याचा दावा केला आहे.

दरम्यान, इराणनेही संभाव्य अमेरिकन हल्ल्याला तोंड देण्यासाठी पूर्ण तयारी केल्याचे स्पष्ट केले आहे. इराणी सरकारी वृत्तसंस्था 'तस्निम'च्या वृत्तानुसार, देशभरातील लष्करी तळांच्या संरक्षणासाठी १००० ड्रोन तैनात करण्यात आले आहेत. हे ड्रोन कोणत्याही अमेरिकन हालचालींवर सतत नजर ठेवतील. सुरक्षेच्या कारणास्तव या ड्रोनचे छायाचित्रे प्रसिद्ध करण्यात आलेली नाहीत.

अलिकडेच ट्रम्प यांनी अमेरिकेचे विमानवाहू जहाज 'यूएसएस अब्राहम लिंकन' मध्य पूर्वेकडे रवाना झाल्याची घोषणा केली होती. या जहाजासोबत अनेक क्षेपणास्त्र-विनाशक तैनात असून, गरज भासल्यास तात्काळ कारवाई केली जाऊ शकते, असा इशाराही त्यांनी दिला.

ट्रम्प यांनी 'ट्रुथ सोशल'वर लिहिले की, "एक मोठा काफिला इराणकडे जात आहे. तो प्रचंड ताकदीसह एका ठराविक उद्दिष्टासाठी पुढे सरकत आहे." त्यांनी इराणला चर्चेसाठी तयार होण्याचे आवाहन करत, करार झाल्यास संघर्ष थांबू शकतो, असेही म्हटले. मात्र, तेहरानकडून कोणतीही माघार घेण्याची चिन्हे नसून, इराणने सर्वतोपरी प्रत्युत्तरासाठी सज्ज असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट केले आहे.

## संपादकीय

# उच्च शिक्षणातील समता आणि न्यायालय

**उच्च शिक्षण संस्थांमध्ये वाढलेल्या भेदभावाच्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर जाहीर झालेले समतेविषयक नवे नियम सध्या वादाच्या केंद्रस्थानी आहेत. या नियमांतील अस्पष्टतेकडे बोट दाखवत सर्वोच्च न्यायालयाने दिलेली तात्पुरती स्थगिती, समता आणि न्याय यातील समतोलाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आणते.**



शिक्षण ही समाजरचनेची प्रयोगशाळा असते. तिथेच विचार घडतात, भूमिका स्पष्ट होतात आणि उद्याचा समाज आकार घेतो. त्यामुळे शिक्षणसंस्थांमधील वातावरण कसे आहे, तिथे कोणाला सुरक्षित वाटते आणि कोणाला अस्वस्थता जाणवते, हे प्रश्न केवळ प्रशासकीय न राहता सामाजिक ठरतात. गेल्या काही वर्षांत उच्च शिक्षण संस्थांमध्ये भेदभाव, अपमान, दुर्लक्ष किंवा अन्यायाच्या तक्रारी सातत्याने पुढे येत आहेत. ही बाब व्यवस्थेसाठी डोळेझाक करण्यासारखी नाही. याच पार्श्वभूमीवर समतेविषयक नवे नियम आणण्यात आले. या नियमांचा उद्देश स्पष्ट आहे. शिक्षणसंस्थांमध्ये कुणालाही जात, लिंग, सामाजिक ओळख किंवा पार्श्वभूमीमुळे दुय्यम वागणूक मिळू नये. तक्रारींसाठी स्वतंत्र व्यवस्था असावी, चौकशी वेळेत व्हावी आणि जबाबदारी निश्चित व्हावी, अशी अपेक्षा या नियमांमागे आहे. संविधानाने दिलेली समतेची हमी प्रत्यक्ष शिक्षणव्यवस्थेत उतरावी, हा त्यामागचा विचार आहे. मात्र चांगल्या हेतूने आणलेले नियम नेहमीच निर्दोष असतात असे नाही. भारतासारख्या विविध समाजरचनेत नियमांची भाषा, त्याची अंमलबजावणी आणि त्यातून निर्माण होणारे परिणाम यांचा सखोल विचार करावा लागतो. याच ठिकाणी या नियमांबाबत काही गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. नियमांची मांडणी पुरेशी स्पष्ट नाही, त्याचा अर्थ लावताना गैरसमज होऊ शकतात, आणि साध्या मतभेदांनाही तक्रारीचे स्वरूप दिले जाऊ शकते, अशी भीती व्यक्त केली जात आहे. ही भीती पूर्णतः निराधार म्हणता येणार नाही. शिक्षणसंस्था ही संवादाची, प्रश्न विचारण्याची आणि मतभेद मांडण्याची जागा असते. जर त्या जागेत सतत संशयाचे वातावरण निर्माण झाले, तर मुक्त विचारांची गळचेपी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अन्याय रोखण्यासाठी आणलेले नियम जर नव्या तणावांना जन्म देत असतील, तर त्याचे आत्मपरीक्षण गरजेचे ठरते. याच कारणास्तव सर्वोच्च न्यायालयाने या नियमांवर तात्पुरती स्थगिती दिली. न्यायालयाने नियमांचा उद्देश नाकारलेला नाही; मात्र त्यांच्या भाषेतील अस्पष्टता आणि संभाव्य गैरवापराकडे स्पष्टपणे लक्ष वेधले आहे. नियम अधिक नेमके, स्पष्ट आणि सर्वांसाठी न्याय्य असावेत, अशी अपेक्षा न्यायालयाने व्यक्त केली आहे. हा हस्तक्षेप म्हणजे समतेविरोध नव्हे, तर न्याय्य समतेसाठीचा इशारा आहे. येथे एक मूलभूत मुद्दा लक्षात घ्यावा लागतो. समाजातील दुर्बल घटकांना संरक्षण मिळणे अत्यावश्यक आहे. त्यांच्यावर अन्याय झाला तर त्याला वाचा फोडणारी यंत्रणा असलीच पाहिजे. पण त्याच वेळी कोणाच्याही प्रतिष्ठेवर, अभिव्यक्तीस्वातंत्र्यावर किंवा नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांवर आघात होता कामा नये. न्याय हा केवळ एका बाजूचा नसतो; तो संतुलनातून निर्माण होतो. आज या विषयावर दोन टोकाच्या भूमिका समोर येत आहेत. एकीकडे नियमांवर प्रश्न विचारणाऱ्यांना समतेचे विरोधक ठरवले जाते, तर दुसरीकडे नियम म्हणजेच दडपशाही असा ठपका ठेवला जातो. प्रत्यक्षात सत्य या दोन टोकांच्या मध्ये आहे. शिक्षणसंस्थांतील प्रश्न केवळ कागदी नियमांनी सुटत नाहीत; त्यासाठी संवाद, संवेदनशीलता आणि परस्पर विश्वासाची गरज असते. शासन, शिक्षणसंस्था, विद्यार्थी आणि समाज यांच्यातील संवाद हा या प्रक्रियेचा केंद्रबिंदू असायला हवा. नियम बनवताना आणि अंमलात आणताना दोन्ही बाजूंच्या अनुभवांचा विचार झाला पाहिजे. अन्यथा न्याय देण्याच्या उद्देशाने उभे राहिलेले नियमच नव्या वादांचे कारण ठरतील. शिक्षणसंस्था ही समाजाची सूक्ष्म प्रतिमा असते. तिथे घडणारा विद्यार्थीच उद्याचा नागरिक असतो. त्या जागा भयमुक्त, न्याय्य आणि समतोल असाव्यात, ही अपेक्षा रास्त आहे. समतेविषयक नियम आवश्यक असले तरी, त्यांच्या अस्पष्टतेमुळे गैरवापर आणि तणाव निर्माण होऊ शकतो. संवाद, संवेदनशीलता, परस्पर विश्वास आणि विवेक यांवर आधारित अंमलबजावणी शिक्षणसंस्थेत न्याय आणि समतोल टिकवण्यासाठी अनिवार्य आहे. समतेविषयक नवे नियम आणि न्यायालयाची सावध भूमिका आपल्याला हेच सांगतात की समतेचा मार्ग सोपा नसतो. तो सतत तपासणी, सुधारणा आणि विवेकातूनच पुढे जातो. शिक्षणाच्या प्रांगणात न्याय रुजवायचा असेल, तर नियमांइतकेच समज, संयम आणि संवादही तितकेच महत्त्वाचे आहेत. म्हणूनच आज गरज आहे ती घाईघाईने भूमिका घेण्याची नव्हे, तर विचारपूर्वक सुधारणा करण्याची. शिक्षणव्यवस्था न्यायाची प्रयोगभूमी ठरू शकते, पण ती संघर्षाची रणभूमी होऊ नये. नियम हे साधन असतात, ध्येय नव्हे; ध्येय मात्र समतोल, विश्वासार्ह आणि सर्वसमावेशक शिक्षणव्यवस्था उभारणे हेच असले पाहिजे.

# स्वच्छ ऊर्जेचे स्वप्न आणि उत्पादनाचे वास्तव!

भारताने हवामान बदलाच्या जागतिक चर्चेत स्वतःला जबाबदार राष्ट्र म्हणून मांडले आहे. २०३० पर्यंत नॉन-फॉसिल इंधनावर आधारित ५०० गीगावॉट क्षमतेचे उद्दिष्ट, कार्बन उत्सर्जन कमी करण्याची वचने आणि स्वच्छ ऊर्जा उत्पादनाला चालना देण्यासाठी आखलेली धोरणे हे त्याचे प्रतीक मानले जाते. मात्र धोरण आणि अंमलबजावणी यातील अंतर वाढत चालले की उद्दिष्टे कागदावरच सुंदर राहण्याचा धोका निर्माण होतो. आज नॉन-फॉसिल ऊर्जा उत्पादन आणि पीएलआय योजनांची स्थिती पाहिली तर हाच प्रश्न प्रकर्षाने पुढे येतो. पीएलआय योजना मुळात उत्पादन क्षेत्राला चालना देण्यासाठी आखण्यात आल्या. दूरसंचार, मोबाईल उत्पादन यांसारख्या क्षेत्रात त्याचे काही सकारात्मक परिणाम दिसले. त्याच यशाच्या आधारे सौर ऊर्जा उपकरणे, बॅटरी, इलेक्ट्रिक वाहनांसाठी आवश्यक घटक यांच्यातही अशीच झपाट्याने प्रगती होईल, अशी अपेक्षा निर्माण झाली. पण स्वच्छ ऊर्जा क्षेत्रातील उत्पादन ही केवळ असेंब्लीची बाब नसून ती दीर्घकालीन तांत्रिक गुंतवणुकीची प्रक्रिया आहे, हे वास्तव धोरणकर्त्यांनी पुरेसे लक्षात घेतले नाही, असे दिसते. सौर पॅनेल उत्पादनाचा विचार केला तर भारतात पॅनेल जोडणीची क्षमता वाढली आहे, हे खरे. मात्र पॅनेलसाठी लागणारे पोलिसिलिकॉन, वेफर आणि सेल यांचे उत्पादन अजूनही मर्यादित आहे. मूल्य साखळीतील महत्त्वाचा अपस्ट्रीम भाग परदेशांवर अवलंबून राहतो. त्यामुळे आपण स्वच्छ ऊर्जेच्या उपकरणांचा वापर वाढवतो, पण त्यासाठी लागणाऱ्या मूलभूत घटकांचे उत्पादन मात्र इतर देशांवर सोपवतो. हे चित्र आत्मनिर्भरतेच्या संकल्पनेशी विसंगत आहे. बॅटरी उत्पादनाची स्थिती तर अधिक चिंताजनक आहे. इलेक्ट्रिक वाहनांचा विस्तार, ऊर्जा साठवण प्रणाली आणि ग्रीड स्थैर्य यासाठी बॅटरी हा कणा मानला जातो. मात्र देशांतर्गत बॅटरी सेल उत्पादन

> » **भारताने स्वच्छ ऊर्जेकडे वाटचाल करताना मोठी उद्दिष्टे जाहीर केली, पण उत्पादन क्षमतेच्या पातळीवर वास्तव वेगळे चित्र दाखवते. धोरणे, प्रोत्साहने आणि आकडे यामधील विसंगती आता स्पष्टपणे समोर येत असून, आत्मनिर्भरतेचा दावा तपासला जात आहे.**





अपेक्षित गतीने पुढे सरकत नाही. गिगाफॅक्टरी उभारणी, कच्च्या मालाची उपलब्धता, प्रक्रिया तंत्रज्ञान आणि गुणवत्ता नियंत्रण यासाठी जेवढी सखोल तयारी आवश्यक आहे, तेवढी ती झालेली नाही. सरकारी अनुदाने आणि प्रोत्साहन योजनेतून आर्थिक आधार दिला जातो, पण तांत्रिक परिसंस्था उभारण्यासाठी लागणारा वेळ आणि कौशल्य विकास याकडे दुय्यम लक्ष दिले गेले, असे दिसते. या अडचणींची कारणे केवळ उद्योगांकडे बोट दाखवून समजावून घेता येणार नाहीत. धोरण रचनेतच काही मूलभूत त्रुटी आहेत. पीएलआय योजनांमध्ये आर्थिक ताकद, मोठे गुंतवणूक प्रस्ताव आणि वेळेत उत्पादन सुरू करण्याच्या अटी यांना अधिक महत्त्व देण्यात आले. तांत्रिक अनुभव, संशोधन क्षमता आणि दीर्घकालीन नवकल्पनांची तयारी यांचा विचार तुलनेने कमी झाला. परिणामी काही कंपन्या मोठ्या अपेक्षांसह पुढे आल्या, पण प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या टप्प्यावर अडचणीत सापडल्या. स्वच्छ ऊर्जा उत्पादनासाठी जागतिक स्पर्धा तीव्र आहे. चीन, दक्षिण कोरिया, जपान आणि काही युरोपीय देशांनी गेल्या दोन दशकांत या क्षेत्रात सातत्याने गुंतवणूक केली आहे. त्यांच्याकडे प्रशिक्षित मनुष्यबळ, संशोधन संस्था आणि स्थिर पुरवठा साखळी आहे. भारतात मात्र धोरणे वेगाने जाहीर होतात, पण त्यांना पूरक संस्थात्मक रचना हळूहळू उभी राहते. या विसंगतीचा परिणाम उत्पादन क्षमतेवर होतो. याशिवाय नियमांची गुंतागुंत, आयात निर्बंध, स्थानिक मूल्यवर्धनाच्या अटी आणि काही वेळा धोरणातील अचानक बदल यामुळे उद्योगांमध्ये अनिश्चितता निर्माण होते. दीर्घकालीन प्रकल्पांसाठी स्थिर धोरण वातावरण आवश्यक असते.

स्वच्छ ऊर्जा क्षेत्रातील गुंतवणूक ही एका आर्थिक वर्षात परतावा देणारी नसते; ती दशकांचा विचार करून केली जाते. या दृष्टीने सातत्याचा अभाव जाणवतो. या पार्श्वभूमीवर पीएलआय आणि स्वच्छ ऊर्जा धोरणांचे पुनर्मूल्यांकन करणे आवश्यक ठरते. उत्पादन क्षमतेचे आकडे वाढवण्यापेक्षा संपूर्ण मूल्य साखळी मजबूत करण्यावर भर द्यावा लागेल. संशोधन आणि विकासासाठी सार्वजनिक-खासगी भागीदारी, कौशल्य प्रशिक्षणासाठी दीर्घकालीन कार्यक्रम आणि तंत्रज्ञान आत्मसात करण्यासाठी लवचिक धोरणे ही काळाची गरज आहे. केवळ अनुदान देऊन उत्पादन उभे राहत नाही, हे वास्तव स्वीकारावे लागेल. स्वच्छ ऊर्जा ही भविष्यातील गरज आहे,

याबाबत दुमत नाही. मात्र त्या दिशेने वाटचाल करताना घोषणा आणि वास्तव यातील अंतर कमी करणे अधिक महत्त्वाचे आहे. अन्यथा भारत स्वच्छ ऊर्जेचा मोठा ग्राहक बनेल, पण त्याचा प्रमुख उत्पादक होण्याचे स्वप्न अपूर्णच राहील. हे स्वप्न साकार करायचे असेल तर धोरणात आत्मपरीक्षण, अंमलबजावणीत शिस्त आणि तंत्रज्ञानाबाबत दीर्घकालीन दृष्टी आवश्यक आहे.

# महापौर व उपमहापौर पदाच्या निवडणुकीसाठी ६ फेब्रुवारीला विशेष सभा

## यशवंतराव चव्हाण सभागृहात होणार असल्याची आयुक्त श्रावण हर्डीकर यांची माहिती

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी चिंचवड :** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महापौर व उपमहापौर पदाच्या निवडणुकीसाठी शुक्रवार, दि. ६ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता विशेष सभेचे आयोजन करण्यात आले आहे. ही सभा महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील यशवंतराव चव्हाण सभागृहात होणार असल्याची माहिती आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी दिली आहे. या विशेष सभेत महापौर व उपमहापौर निवडीबरोबरच स्थायी समिती आणि विविध पाच विशेष समित्यांच्या सदस्यांची नियुक्ती देखील करण्यात येणार आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे महापौर पद सर्वसाधारण प्रवर्गासाठी आरक्षित असून, या पदासह उपमहापौर पदाची निवडही याच विशेष सभेत केली जाणार आहे. यासंदर्भातील आदेश पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या स्वाक्षरीने जारी करण्यात आले आहेत. या विशेष सभेचे पिठासीन अधिकारी म्हणून विभागीय आयुक्तांचे प्रतिनिधी म्हणून सहकार आयुक्त दिपक तावरे काम पाहणार आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार महापौर व उपमहापौर निवडीसाठी विशेष सभा घेणे बंधनकारक आहे. त्या अनुषंगाने ही सभा आयोजित करण्यात आली असून, या सभेत स्थायी समितीवर १६ सदस्यांची नियुक्ती करण्यात येणार आहे. तसेच पाच विशेष समित्यांवर प्रत्येकी ९ सदस्यांची निवड केली जाणार आहे. विशेष समित्यांवरील सदस्य नियुक्ती करताना पक्ष किंवा गटांच्या संख्याबळानुसार प्रतिनिधित्व देण्यात येणार आहे.महापौर व उपमहापौर पदासाठी नामनिर्देशन पत्रांचे छापील फॉर्म महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील तिसऱ्या मजल्यावरील नगरसचिव कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपलब्ध असतील. नामनिर्देशन पत्र दाखल करण्यासाठी सोमवार, दि. २ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी ३ ते ५ वाजेपर्यंतची वेळ निश्चित करण्यात आली आहे, अशी माहिती नगरसचिव मुकेश कोळप यांनी दिली. महिला व बालकल्याण समितीवर किमान ७५ टक्के महिला सदस्यांची नियुक्ती केली जाणार आहे.

# रावेत परिसरात जलवाहिनीला गळती

## शहरातील अनेक भागांचा पाणीपुरवठा खंडित होणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी चिंचवड :** पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील रावेत परिसरात मुख्य अशुद्ध पाण्याच्या (रॉ वॉटर) जलवाहिनीला गळती आढळून आल्याने शहराच्या पाणीपुरवठा व्यवस्थेवर परिणाम झाला आहे. ही गळती लक्षात येताच महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने तातडीने दुरुस्तीचे काम हाती घेतले आहे.

पाणीपुरवठा विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार, गळती दुरुस्तीचे काम आज रविवारी (दि. २५) सायंकाळपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे. मात्र, या दुरुस्ती कामामुळे पिंपरी-चिंचवड शहरातील अनेक भागांमध्ये आज संध्याकाळचा पाणीपुरवठा पूर्णपणे खंडित राहणार आहे. तसेच काही भागांमध्ये पाणीपुरवठा कमी दाबाने होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

दुरुस्ती कामानंतर जलवाहिनी सुरळीत झाल्यानंतर पाणीपुरवठा हळूहळू पूर्ववत केला जाणार आहे. तथापि, उद्या देखील काही परिसरांमध्ये कमी दाबाने पाणीपुरवठा होण्याची शक्यता असल्याचे पाणीपुरवठा विभागाने स्पष्ट केले आहे.

या पार्श्वभूमीवर शहरातील नागरिकांनी उपलब्ध पाण्याचा काटकसरीने व नियोजनबद्ध वापर करावा, असे आवाहन पाणीपुरवठा विभागाचे सह शहर अभियंता अजय सूर्यवंशी यांनी केले आहे. पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी विभागाचे अधिकारी व कर्मचारी युद्धपातळीवर काम करत असून नागरिकांच्या सहकार्याची अपेक्षा प्रशासनाकडून व्यक्त करण्यात आली आहे.

# 'स्वच्छ सर्वेक्षण २०२६' साठी पिंपरी चिंचवड महापालिकेची जोरदार तयारी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** स्वच्छ सर्वेक्षण २०२५ मध्ये राज्यात प्रथम आणि देशात सातवा क्रमांक पटकावलेल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने आता स्वच्छ सर्वेक्षण २०२६ मध्ये देशात अव्वल स्थान मिळवण्याचे उद्दिष्ट ठेवत जोरदार तयारी सुरू केली आहे. या मोहिमेत शहर स्वच्छतेसाठी शेकडो सफाई सेवक अहोरात्र कार्यरत असून अत्याधुनिक यंत्रसामग्रीच्या सहाय्याने शहराचे रूप पालटले जात आहे.

महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर व अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली, उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल आणि सहायक आयुक्त अमित पंडित यांच्या नेतृत्वाखाली व्यापक स्वच्छता मोहीम राबविली जात आहे. उद्योगनगरी व गजबजलेली बाजारपेठ असलेल्या पिंपरी चिंचवडमध्ये दिवसा स्वच्छता करणे आव्हानात्मक ठरत असल्याने प्रशासनाने रात्रपाळी स्वच्छता मोहिम अधिक तीव्र केली आहे. या मोहिमेत मेकॅनिकल स्वीपिंग मशीन, वॉटर स्प्रिंकलर्स आदी आधुनिक साधनांचा वापर करून रस्त्यांवरील धूळ व कचरा प्रभावीपणे हटवला जात आहे. शहर झोपेत असताना सफाई सेवक 'स्वच्छता योद्धे' म्हणून शहराला नव्या दिवसासाठी सज्ज करत आहेत.

महापालिकेने नागरिकांना ओला व सुका कचरा वेगळा देणे, अनधिकृत पार्किंग टाळणे आणि सार्वजनिक स्वच्छता राखणे असे आवाहन केले आहे.

# अजित पवार यांना चित्रपटगृहांतून श्रद्धांजली देण्याचे आवाहन

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री आणि पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री स्व. अजित पवार यांच्या निधनाने संपूर्ण महाराष्ट्रावर शोककळा पसरली आहे. राज्याच्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकीय जडणघडणीत त्यांनी दिलेले योगदान अतुलनीय असून त्यांच्या निधनाने निर्माण झालेली पोकळी कधीही न भरून येणारी असल्याची भावना विविध स्तरांतून व्यक्त होत आहे.

स्व.अजित पवार यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीत सर्वसामान्य जनता, शेतकरी, युवक, कामगार, कलाकार तसेच सांस्कृतिक क्षेत्राशी घट्ट नाते जपले. लोकांच्या प्रश्नांशी थेट जोडलेले नेतृत्व म्हणून ते ओळखले जात होते. त्यांच्या या योगदानाची आठवण जपण्यासाठी आणि त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी राज्यातील सर्व मल्टिप्लेक्स तसेच सिंगल स्क्रिन चित्रपटगृहांमध्ये तीन दिवस भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्याची व्यवस्था करण्यात यावी, अशी विनंती राष्ट्रवादी काँग्रेसच्या चित्रपट व सांस्कृतिक विभागाच्या वतीने करण्यात आली आहे. या संदर्भात जारी करण्यात आलेल्या प्रसिद्धीपत्रकानुसार, श्रद्धांजली कार्यक्रमांतर्गत चित्रपटगृहांमध्ये शोपूर्वी किंवा शोदरम्यान दोन मिनिटांचे मौन पाळणे, श्रद्धांजली स्लाइड किंवा व्हिडिओचे प्रदर्शन करणे, तसेच अन्य सन्मानपूर्वक उपाययोजना राबविण्यात याव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे. यामुळे सर्वसामान्य प्रेक्षकांनाही या महान नेतृत्वाला आदरांजली वाहण्याची संधी मिळेल, असेही नमूद करण्यात आले आहे. चित्रपटगृह हे केवळ मनोरंजनाचे माध्यम नसून समाजाशी जोडलेले एक प्रभावी व्यासपीठ आहे. त्यामुळे सामाजिक बांधिलकी जपत राज्यातील सर्व थिएटर मालक, मल्टिप्लेक्स चालक आणि व्यवस्थापन यांनी या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

# अजित पवारांच्या निधनामुळे पिंपरी-चिंचवड पोरके झाल्याची नागरिकांची भावना

## लहान मुलाप्रमाणे पिंपरी-चिंचवडला जपल्याचे सांगताना फुटला अनेक नागरिकांच्या भावनांचा बांध...

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी चिंचवड :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात पिंपरी-चिंचवडमधून झाली होती. अजित पवार यांनी १९९२ मध्ये पहिल्यांदा बारामती लोकसभा मतदार संघातून निवडणूक लढवली होती. बारामती माझी जन्मभूमी असली, तरी पिंपरी-चिंचवड माझी कर्मभूमी असल्याचे अजितदादा नेहमी आवर्जून सांगत. रामकृष्ण मोरे यांच्यानंतर अजित पवार यांनी हे शहर घडवले. ते खऱ्या अर्थाने पिंपरी-चिंचवडचे नवनिर्माते ठरले.

बारामती लोकसभा मतदारसंघातून १९९१ मध्ये पहिल्यांदा अजित पवार यांनी निवडणूक लढवली. त्यावेळी पिंपरी-चिंचवडचा परिसर बारामती लोकसभा मतदारसंघात होता. या निवडणुकीत अजित पवार लोकसभेत निवडून गेले. तेव्हापासून त्यांचा पिंपरी-चिंचवडच्या राजकारणात प्रवेश झाला. अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली पिंपरी-चिंचवड महापालिकेत राष्ट्रवादी काँग्रेसची सलग १५ वर्षे एकहाती सत्ता होती. या कालावधीत पिंपरी-चिंचवड शहराचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. भविष्यात शहराच्या कोणकोणत्या पद्धतीच्या गरजा असू शकतात, याबाबत सखोल अभ्यास करून अजित पवारांनी पिंपरी-चिंचवड शहर विकासाचा आराखडा तयार केला.

### क्रीडा स्पर्धा थेट प्रक्षेपण

पिंपरी-चिंचवड महापालिकेने अजितदादांच्या मार्गदर्शनावरून काळाशी सुसंगत अशा काही प्रणालींचा अवलंब केला आहे. इ-सुविधा प्रणालीच्या अंतर्गत शहरवासीयांना ऑनलाईन बिल भरणा सुविधा उपलब्ध करून दिली आहे. लोकहितासाठीचे अनेक विकासप्रकल्प दादांच्या नेतृत्वाखाली उभारण्यात आले. त्यात जेएनयूआरएमच्या माध्यमातून गरीबांसाठी गृहप्रकल्प, निगडी ओटास्कीम उभी राहिली. रस्ते, उड्डाणपूल, ग्रेड सेपरेटर, उद्याने तयार झाली. नागरिकांच्या आरोग्य सेवेसाठी मोठी रुग्णालये तसेच इतरही लोकोपयोगी विविध प्रकल्प उभारण्यात आले.

बारामती माझी जन्मभूमी असली, तरी पिंपरी-चिंचवड माझी कर्मभूमी असल्याचे सांगून उद्योगनगरीचा कायापालट करणारे, आधुनिक पिंपरी-चिंचवडचे शिल्पकार उपमुख्यमंत्री, पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातात बुधवारी निधन झाले आहे. पिंपरी-चिंचवड शहराशी अजित पवार यांचे जिव्हाळ्याचे, प्रेमाचे नाते होते. शहरावर मनापासून प्रेम करणारे अजित पवार यांच्या निधनामुळे शहर पोरके असे सांगताना उद्योगनगरीतील अनेक सर्वसामान्य नागरिकांना अश्रू अनावर झाले होते.


> **गुणवत्तेशी केली नाही तडजोड....**
>
> ● अजित पवारांनी बारामतीप्रमाणेच पिंपरी-चिंचवड शहरावर प्रेम केले. ते भल्या पहाटे शहरात येवून विकासकामांची पाहणी करायचे. त्यामुळे पदाधिकारी, अधिकाऱ्यांवर वचक राहत होता. परिणामी, कामाच्या दर्जाशी कधीही, कोणतीही तडजोड झाली नाही. शहरातील कामे गुणात्मक झाली आहेत.

### अशी घडवली उद्योगनगरी....

शहराच्या मूलभूत समस्यांची यादी अजित पवारांनी बनवली. सुलभ दळणवळणाच्या दृष्टिकोनातून सार्वजनिक वाहतूक सेवा सक्षम कशी होईल, याचा ही पूरक अभ्यास केला. यात चांगल्या दर्जाचे रस्ते, सार्वजनिक बससेवा वाढवणे, पर्यायी वाहतुकीचे मार्ग उपलब्ध करून देणे इत्यादीचा समावेश आहे. याखेरीज आधुनिकीकरणाच्या प्रयत्नात शहरातील पर्यावरणाची काही हानी होणार नाही, याची नीट खबरदारी त्यांनी घेतली. जिल्ह्याचे पालकमंत्री आणि राज्याचे उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री म्हणून कार्यरत असताना पवारांनी शहराच्या विकास कामांसाठी मोठ्या निधीची तरतूद केली.

# शरद पवारांचे विश्वासू सहकारी, माजी महापौर शांतीलाल सुरतवाला यांचे निधन

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, पुण्याचे माजी महापौर आणि शरद पवार यांचे अत्यंत विश्वासू सहकारी शांतीलाल सुरतवाला यांचे शुक्रवारी (दि. ३० जानेवारी २०२६) पहाटे पुण्यातील रुबी हॉल क्लिनिक येथे उपचारादरम्यान निधन झाले. ते ७६ वर्षांचे होते. गेल्या काही काळापासून ते कर्करोगासारख्या गंभीर आजाराशी झुंज देत होते.

शांतीलाल सुरतवाला यांच्या निधनामुळे पुणे शहराच्या राजकीय, सामाजिक आणि सहकार क्षेत्रात मोठी शोककळा पसरली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासाठी त्यांनी आयुष्यभर निष्ठेने काम केले. "मान कापली तरी पवार साहेबांना सोडणार नाही" हे त्यांचे वाक्य त्यांच्या निष्ठेचे प्रतीक मानले जात होते.

१९७९ साली पुणे महापालिकेत नगरसेवक म्हणून त्यांनी राजकीय कारकिर्दीची सुरुवात केली. त्यानंतर त्यांनी शहराध्यक्ष, नगरसेवक आणि १९९२–९३ या काळात पुण्याचे महापौर म्हणून जबाबदारी पार पाडली. नगरविकास, सामाजिक सलोखा आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी ते कायम कटिबद्ध राहिले. अभ्यासू वृत्ती, शांत स्वभाव आणि लोकहितासाठी अखंड झटणारे नेतृत्व म्हणून त्यांची ओळख होती. पक्षातील तरुण कार्यकर्त्यांसाठी ते नेहमीच मार्गदर्शक ठरले.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### लोणी येथे श्री विश्वकर्मा जयंती सोहळ्याचे आयोजन

**लोणी (ता. आंबेगाव) :** येथे श्री दत्त गौरीशंकर विश्वकर्मा मंदिर ट्रस्टच्या वतीने शनिवार (दि. ३१) रोजी श्री विश्वकर्मा जयंती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त सकाळी अभिषेक व श्री सत्यनारायण महापूजा, श्री प्रभू विश्वकर्मांची मिरवणूक, मान्यवरांचा सत्कार, ह.भ.प. अशोक महाराज शिंदे (आणे) यांचे हरिकिर्तन व महाप्रसाद, तसेच सायंकाळी स्वरताल गीतगंध संगीत भजनाचा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजन समस्त सुतार समाज लोणी यांच्या वतीने करण्यात आले असल्याची माहिती प्रसिद्धी पत्रकाद्वारे देण्यात आली आहे.

### हुंड्यासाठी ३५ लाख देऊनही छळ कायम

**पुणे :** उरुळी कांचनच्या सोरतापवाडी येथे इंजिनिअर दीप्ती मगर-चौधरी यांच्या मृत्यू प्रकरणात सीसीटीव्ही फुटेज समोर आल्याने खळबळ उडाली आहे. २०१९ मध्ये विवाह झाल्यानंतर पती व सासरकडून मानसिक व शारीरिक छळ झाल्याचा आरोप आहे. व्यवसाय व गाडीसाठी ३५ लाख रुपये देऊनही छळ थांबला नाही. घटनेनंतर दीप्तीला घराबाहेर काढून गाडीत टाकल्याचे फुटेजमध्ये दिसत असून, रुग्णालयात पोहोचण्यापूर्वीच तिचा मृत्यू झाला. प्रकरणाची चौकशी सुरू आहे.

### लोणी काळभोरमध्ये भाजपचे 'कमळ'च फुलणार - काळभोर

**लोणी काळभोर :** पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सक्षम नेतृत्वाखाली केंद्र व राज्यातील भाजप सरकारने लोकाभिमुख व विकासाभिमुख कामे केली असून, त्याचा थेट फायदा जनतेला झाला आहे, असा विश्वास हवेली पंचायत समितीचे माजी उपसभापती सनी उर्फ युगंधर काळभोर यांनी व्यक्त केला. आवास योजना, उज्ज्वला, शेतकरी सन्मान निधी, जलजीवन मिशन आदी योजनांमुळे भाजपला भक्कम पाठिंबा मिळत असून, लोणी काळभोर जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणात भाजपचाच विजय निश्चित असल्याचा ठाम दावा त्यांनी केला.

## जिल्हा परिषद-पंचायत समिती निवडणुकीसाठी

# 23,743 अधिकारी-कर्मचारी तैनात!

**+ 7 फेब्रुवारीला मतदान; 3,605 मतदान केंद्रांवर प्रशासन सज्ज**

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी जिल्हा प्रशासनाने व्यापक तयारी पूर्ण केली असून, मतदान प्रक्रियेसाठी तब्बल 23 हजार 743 अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार आवश्यक मनुष्यबळाच्या तुलनेत 30 टक्के अतिरिक्त अधिकारी-कर्मचारी उपलब्ध करून देण्यात आले असून, त्यामुळे कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडण्याचा प्रशासनाचा प्रयत्न आहे. निवडणुकीच्या तारखेत बदल करण्यात आला असून, आता जिल्ह्यातील मतदान 7 फेब्रुवारी रोजी होणार आहे.

जिल्ह्यात एकूण 3 हजार 605 मतदान केंद्रांची स्थापना करण्यात आली आहे. मतदारसंख्या व भौगोलिक परिस्थिती लक्षात घेऊन मतदान केंद्रांचे नियोजन करण्यात आले आहे. इंदापूर तालुक्यात सर्वाधिक 400 मतदान केंद्र असून, तेथे 2 हजार 632 अधिकारी व कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. तर वेल्हा तालुक्यात सर्वात कमी 105 मतदान केंद्र असून, तेथे 450 अधिकारी व कर्मचारी तैनात राहणार आहेत.

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी प्रत्यक्ष मतदान प्रक्रियेसाठी 18 हजार 179 अधिकारी व कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे. मात्र, आयोगाच्या सूचनेनुसार 5 हजार 564 अतिरिक्त अधिकारी व कर्मचारी राखीव स्वरूपात नियुक्त करण्यात आले आहेत. त्यामुळे एकूण 23 हजार 743 अधिकारी व कर्मचारी मतदान प्रक्रियेत सहभागी होणार आहेत. या सर्वांना मतदान केंद्रांवरील जबाबदाऱ्यांचे नियुक्ती आदेश जिल्हा प्रशासनाकडून जारी करण्यात आले आहेत.

बाराशेहून अधिक मतदार असलेल्या मतदान केंद्रांवर अतिरिक्त मतदान केंद्राध्यक्ष म्हणजेच प्रिसायडिंग ऑफिसरची नियुक्ती करण्यात येणार आहे. यामुळे मतदारांची गर्दी नियंत्रित ठेवणे आणि मतदान प्रक्रिया वेळेत पूर्ण करणे शक्य होणार आहे. प्रत्येक मतदान केंद्रावर एक मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी क्रमांक 1, 2 व 3 तसेच एक शिपाई नेमण्यात येणार आहे.

मतदान प्रक्रियेतील पारदर्शकता व काटेकोर अंमलबजावणीसाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांना तीन टप्प्यांत प्रशिक्षण देण्यात येणार आहे. पहिली दोन प्रशिक्षण सत्रे प्रत्येकी दोन दिवसांची असतील, तर तिसरे व अंतिम प्रशिक्षण प्रत्यक्ष मतदानाच्या आदल्या दिवशी घेण्यात येणार आहे. या प्रशिक्षणात ईव्हीएम हाताळणी, मतदान प्रक्रिया, कायदेशीर बाबी व आपत्कालीन परिस्थितीतील उपाययोजना याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले जाणार आहे.

**मतदार संभ्रमात, 'नोटा'ही चर्चेत**

● दरम्यान, जिल्ह्यातील 13 तालुक्यांपैकी 8 तालुक्यांमध्ये सूक्ष्म निरीक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. मात्र, बारामती, मावळ, शिरूर, हवेली आणि पुरंदर या तालुक्यांमध्ये सूक्ष्म निरीक्षकांची नेमणूक करण्यात आलेली नाही. प्रशासनाने निवडणूक प्रक्रिया शांततापूर्ण, मुक्त व निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी सर्व यंत्रणा सज्ज असल्याचे स्पष्ट केले आहे.

## जि.प., पंचायत समिती निवडणुकीसाठी ईव्हीएम कमिशनिंग प्रशिक्षण संपन्न

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चर :** जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणूक प्रक्रियेतील महत्त्वाचा टप्पा असलेल्या ईव्हीएम कमिशनिंगसाठी प्रशिक्षण कार्यक्रम शासकीय तंत्रनिकेतन, अवसरी येथील सभागृहात यशस्वीरीत्या पार पडला. निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता, अचूकता व विश्वासार्हता राखण्यासाठी हे प्रशिक्षण अत्यंत महत्त्वाचे असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

तहसीलदार तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी सतीश थेटे यांनी प्रशिक्षणार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. या वेळी तहसीलदार डॉ. सचिन वाघ व गटविकास अधिकारी अर्चना कोल्हे उपस्थित होते. प्रशिक्षणामध्ये क्षेत्रीय अधिकारी तसेच ईव्हीएम कमिशनिंग प्रक्रियेत प्रत्यक्ष सहभागी असलेले सर्व संबंधित अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते.

प्रशिक्षणादरम्यान ईव्हीएम कमिशनिंगची संपूर्ण प्रक्रिया टप्प्याटप्प्याने समजावून सांगण्यात आली. यामध्ये ईव्हीएम कमिशनिंगचे विविध टप्पे, प्रत्येक टप्प्यात घ्यावयाची आवश्यक खबरदारी, तसेच मतदान केंद्रांच्या संख्येनुसार आवश्यक असलेल्या ईव्हीएम मशिन्सची संख्या निश्चित करण्याबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले. प्रत्यक्ष कामकाज करताना कोणतीही चूक होऊ नये, यासाठी नियम व मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन करण्यात आले.

निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी व मतदान यंत्रणेबाबत नागरिकांचा विश्वास अधिक दृढ करण्यासाठी असे प्रशिक्षण उपयुक्त ठरणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

ईव्हीएम कमिशनिंगचे प्रत्यक्ष कामकाज येत्या ३ फेब्रुवारी रोजी सकाळी ८ वाजता सुरू होणार असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

## माघ पौर्णिमा यात्रेसाठी धामणीतील श्री म्हाळसाकांत खंडोबा देवस्थान सज्ज

**रस्ते दुरुस्ती, स्वच्छता, वाहतूक नियोजन व पोलिस बंदोबस्तावर विशेष**

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**धामणी (ता. आंबेगाव) :** व नगर जिल्ह्याचे कुलदैवत श्री म्हाळसाकांत खंडोबा देवस्थान, धामणी येथे येत्या १ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या माघ पौर्णिमा यात्रेच्या पार्श्वभूमीवर गाव व देवस्थानच्या वतीने जय्यत तयारी करण्यात आली आहे. दरवर्षी माघ पौर्णिमेला पुणे व नगर जिल्ह्यासह विविध भागांतून हजारो भाविक भक्त खंडोबाच्या दर्शनासाठी येथे येतात. भाविकांची कोणतीही गैरसोय होऊ नये तसेच वाहतुकीची कोंडी टाळता यावी यासाठी ग्रामपंचायतीच्या वतीने रस्त्यांच्या साईट पट्ट्या दुरुस्त करणे, झाडे-झुडपे हटवणे अशी कामे हाती घेण्यात आली आहेत.

शिरदाळे, पहाडधरा, लोणी व पारगाव या मार्गांवरून येणाऱ्या भाविकांसाठी रस्ते सुस्थितीत ठेवण्याबरोबरच वाहनतळासाठी स्वतंत्र जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. यात्रेच्या अनुषंगाने रस्त्यांची डागडुजी, खड्डे बुजवणे, स्वच्छता मोहीम, दर्शन रांगांचे नियोजन, बैलगाडा घाट, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, लाईट व्यवस्था तसेच आरोग्य सुविधांवर विशेष लक्ष देण्यात आले आहे.

यात्रेच्या दिवशी दर्शन रांगा, जागरण-गोंधळ कार्यक्रम व एकूणच कायदा-सुव्यवस्था सुरळीत राखण्यासाठी पारगाव पोलीस स्टेशनच्या वतीने पोलिस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. श्री म्हाळसाकांत खंडोबा मंदिर परिसराची स्वच्छता करण्यात येत असून मंदिरावर विद्युत रोषणाई केली जाणार आहे.

देवस्थानाच्या दोन्ही महाद्वारांच्या दरम्यान खंडोबाच्या मानाच्या काठीचे मानकरी समस्त राजगुरू मंडळी, अवसरी खुर्द (ता. आंबेगाव) यांनी तीन वर्षांपूर्वी अर्पण केलेल्या "येळकोट येळकोट, जय मल्हार" जयघोषाच्या इलेक्ट्रिक बोर्डावर नुकतेच खंडेरायाचे त्रिशूळ व डमरू नव्याने बसविण्यात आले आहे. या बोर्डाची वर्षातून तीन वेळा नियमित देखभाल केली जाते. यात्रा काळात भाविक व व्यावसायिकांना कोणतीही अडचण येऊ नये याची दक्षता घेण्यात आली असल्याचे सरपंच अक्षयराजे विधाटे व देवस्थानच्या वतीने प्रकाश जाधव पाटील यांनी सांगितले.

## श्री शिव छत्रपती महाविद्यालयात मराठी काव्यवाचन स्पर्धा उत्साहात

**मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग**

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**बनकारफाटा :** जुन्नर तालुका शिवनेर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्री शिव छत्रपती महाविद्यालय, जुन्नर येथे मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त मराठी काव्यवाचन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या मराठी विभाग, मराठी वाङ्मय मंडळ व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQAC) यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कला शाखेचे प्रमुख डॉ. अभिजीत पाटील उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात त्यांनी मराठी भाषेचे महत्त्व अधोरेखित करत, विद्यार्थ्यांमध्ये सृजनशीलता, संवेदनशीलता आणि अभिव्यक्ती कौशल्य विकसित करण्यासाठी अशा साहित्यिक उपक्रमांचे महत्त्व विशद केले. मराठी भाषा ही केवळ संवादाचे माध्यम नसून सांस्कृतिक ओळखीचा आत्मा असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ. वंदना नढे यांनी केले. त्यांनी महाराष्ट्राची राजभाषा असलेल्या मराठी भाषेचा दैनंदिन जीवनात अधिकाधिक वापर व्हावा, तसेच मराठी भाषेचे संवर्धन व जतन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे आपल्या मनोगतातून स्पष्ट केले.

या काव्यवाचन स्पर्धेत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी स्वरचित, प्रसिद्ध तसेच आवडत्या कवींच्या कविता सादर केल्या. विद्यार्थ्यांच्या प्रभावी सादरीकरणामुळे कार्यक्रमात साहित्यिक आणि उत्साही वातावरण निर्माण झाले. मराठी भाषेवरील प्रेम, सामाजिक भान, भावनिक अभिव्यक्ती आणि कल्पनाशक्ती यांचे सुंदर दर्शन या सादरीकरणांतून घडले.

संस्थेचे अध्यक्ष ॲड. संजय शिवाजीराव काळे, अध्यक्ष प्रतिनिधी प्रा. व्ही. बी. कुलकर्णी तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. बी. वाघमारे यांनी या उपक्रमासाठी आयोजकांचे अभिनंदन करत विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन नम्रता सोनवणे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. विष्णू घोडे यांनी केले. मराठी भाषा संवर्धनाच्या दृष्टीने हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.



लोणी-धामणी परिसरात ज्वारी काढणी अंतिम टप्प्यात आली असून शेतकऱ्यांकडून कडबा गोळा करण्याचे काम सुरू आहे.

### लोणी काळभोरमध्ये घड्याळाचाच गजर होणार - भोलेनाथ उर्फ चंदर शेलार

**लोणी काळभोर :** जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका या विकास, पारदर्शकता आणि लोकहितासाठीच असाव्यात, असे सांगत लोणी काळभोरचे माजी सरपंच भोलेनाथ उर्फ चंदर शेलार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या 'घड्याळ' चिन्हाला मतदान करण्याचे आवाहन केले. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या आकस्मिक निधनाने राज्य शोकात असले तरी, हाच शोक राष्ट्रवादीसाठी विजयाची प्रेरणा ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. लोणी काळभोर, कदमवाकवस्ती व वडकी परिसर हा राष्ट्रवादीचा बालेकिल्ला असून विकासकामांमुळे पक्षाला भक्कम पाठिंबा मिळत असल्याचे शेलार म्हणाले. या निवडणुकीत राष्ट्रवादीकडून शीतल कांबळे, रेश्मा काळभोर व अमोल टेकाळे रिंगणात असून, प्रचंड मताधिक्याने विजय मिळवण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

## जुन्नर येथील युनायटेड नामे शाळेत कायदेविषयक शिबिर संपन्न

**राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण व तालुका विधी सेवा समितीच्या संयुक्त विद्यमाने आयोजन**

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**आळेफाटा :** जुन्नर तालुका विधी सेवा समिती व राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार, दि. २९ जानेवारी रोजी जुन्नर येथील युनायटेड नामे शाळेत कायदेविषयक शिबिराचे आयोजन करण्यात आले. बालिकादिनाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरात विद्यार्थ्यांमध्ये कायदेविषयक जागृती निर्माण करण्यावर विशेष भर देण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जुन्नर येथील न्यायाधीश श्रेया जैन या उपस्थित होत्या. अध्यक्षीय भाषणात त्यांनी कायदेविषयक मूलभूत माहिती प्रत्येक नागरिकासाठी आवश्यक असल्याचे सांगत राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती दिली. समाजातील दुर्बल घटक, महिला, बालके व वंचित घटकांना मोफत कायदेशीर मदत मिळावी, यासाठी विधी सेवा समित्यांची भूमिका महत्त्वाची असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जुन्नर तालुका वकील बार असोसिएशनचे अध्यक्ष वकील हेमंत हाडवळे यांनी केले. त्यांनी कायद्याबाबतची माहिती लहान वयातच मिळाल्यास विद्यार्थी जबाबदार नागरिक म्हणून घडतात, असे नमूद केले. वकील रणजित भगत, विश्वनाथ नलावडे, सोमनाथ कोकणे, सलमा सय्यद, तबस्सूम पठाण, तय्यब पठाण, आशिष वानखेडे आणि समकित नानावटी यांनी विद्यार्थ्यांना कायदेविषयक अधिकार, बालहक्क, महिला संरक्षण कायदे, सायबर गुन्हे, मोफत कायदेशीर मदत, कौटुंबिक व सामाजिक कायदे याविषयी माहिती दिली.

**श्रींच्या गाभाऱ्यात आकर्षक पुष्पसजावट; इंद्रायणी घाटावर हरिनाम गजरात आरती**

# आळंदीत जया एकादशीनिमित्त भाविकांची विक्रमी गर्दी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**आळंदी :** येथील जया एकादशीच्या पावन पर्वावर माऊलींच्या दर्शनासाठी आळंदीत भाविकांची मोठी गर्दी उसळली होती. परंपरेनुसार विविध धार्मिक कार्यक्रमांच्या साक्षीने एकादशी उत्साहात साजरी करण्यात आली. पहाटेपासूनच भाविकांनी मंदिरात दर्शनासाठी रांगा लावल्या असून पन्नास हजारांहून अधिक भाविकांनी श्रींचे दर्शन घेतल्याची माहिती मंदिर प्रशासनाकडून देण्यात आली.

एकादशी दिनी भाविकांनी मंदिर दर्शनासोबतच नगरप्रदक्षिणा करत हरिनाम गजरात माऊलींचे दर्शन घेतले. मंदिरातील श्रींच्या गाभाऱ्यातील लक्षवेधी पुष्पसजावटीमुळे श्रींचे रूप अधिकच मनोहर दिसत होते. पहाटे वेदमंत्रांच्या जयघोषात पवमान अभिषेक पार पडला. यावेळी आळंदी संस्थानचे प्रमुख विश्वस्त डॉ. भावार्थ देखणे, विश्वस्त पुरुषोत्तम महाराज पाटील, मुख्य व्यवस्थापक माउली वीर, उपव्यवस्थापक तुकाराम माने, मानकरी, पुजारी, सेवक व कर्मचारी उपस्थित होते.

भाविकांना कमी वेळेत जास्तीत जास्त दर्शन मिळावे, यासाठी प्रमुख विश्वस्त डॉ. भावार्थ देखणे यांच्या मार्गदर्शनाखाली उपव्यवस्थापक तुकाराम माने यांनी सेवक, कर्मचारी व सुरक्षा रक्षकांच्या सहकार्याने उत्तम नियोजन केले. त्यामुळे दर्शन व्यवस्था सुरळीत पार पडली. दुपारी फराळाचा महानैवेद्य, वारकरी शिक्षण संस्थेच्या वतीने परंपरेनुसार प्रवचन, तर रात्री गुरुवारच्या दिवशी श्रींच्या पालखीची मंदिर प्रदक्षिणा व धुपारती विधीपूर्वक पार पडली. सप्ताहातील कीर्तन सेवा हरिनाम गजरात रंगली.

दर्शन व प्रदक्षिणेपूर्वी भाविकांनी इंद्रायणी नदी घाटावर स्नानासाठी मोठी गर्दी केली. संध्याकाळी इंद्रायणी आरती सेवा समितीच्या वतीने इंद्रायणी नदी घाटावर हरिनाम गजरात आरती करण्यात आली. या वेळी ग्रामस्थांसह महिला भाविकांची मोठी उपस्थिती होती.

अलंकापुरीत इंद्रायणी आरती ग्रुप, राजमाता जिजाऊ महिला प्रतिष्ठान, आळंदी जनहित फाउंडेशन, महिला बचत गट, महिला मंडळ व ग्रामस्थांच्या सहभागाने आरती उत्साहात झाली. आरतीनंतर पसायदान व प्रसाद वाटप करण्यात आले. इंद्रायणी नदीचे पावित्र्य जपण्यासाठी व प्रदूषणमुक्तीसाठी सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहन संयोजकांनी केले. एकादशीच्या पार्श्वभूमीवर वाहतूक व सुरक्षा व्यवस्थेसाठी पोलिसांचा कडक बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

आळंदी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक भीमा नरके, पोलीस नाईक मच्छिंद्र शेंडे व वाहतूक शाखेच्या कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. प्रभावी वाहतूक नियोजनामुळे भाविकांना कोंडीचा त्रास झाला नाही. बेकायदेशीर पार्किंग व बेशिस्त वाहनचालकांवर कारवाई सुरू असून, रस्त्यावर वाहने उभी करू नयेत, असे आवाहन पोलिस प्रशासनाने केले आहे.

## मावळच्या विकासासाठी ५ हजार कोटींचा निधी; दादांनी दिलेला शब्द पूर्ण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**वडगाव मावळ :** "मला फक्त आमदार द्या, तुम्हाला हवा तितका निधी देतो," हा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिलेला शब्द मावळकरांसाठी प्रत्यक्षात उतरला. आमदार सुनील शेळके यांच्या माध्यमातून गेल्या पाच वर्षांत मावळ तालुक्याच्या विकासासाठी तब्बल ५ हजार कोटींचा निधी उपलब्ध करून देत तालुक्याचा चेहरामोहरा बदलण्याचे काम करण्यात आले आहे.

सन २०१९ मध्ये सुनील शेळके यांच्या रूपाने मावळला राष्ट्रवादी काँग्रेसचा आमदार मिळाला आणि दादांचे स्वप्न पूर्ण झाले. प्रारंभीची दोन वर्षे कोरोना काळात गेली, काही काळ विरोधातही बसावे लागले; तरीही मावळातील महत्त्वाच्या प्रकल्पांना सातत्याने मंजुरी देण्यात आली. वडगाव मावळ येथील प्रशासकीय इमारत, पोलिस ठाणे, लोणावळा व कान्हे फाटा येथील उपजिल्हा रुग्णालये, अंदर मावळातील सुमारे ४० किमी रस्त्यांचे काँक्रिटीकरण, आदिवासी आश्रमशाळेची नूतन इमारत, तलाठी कार्यालये, तसेच जलजीवन मिशनअंतर्गत पाणीपुरवठा योजना अशी अनेक कामे पूर्णत्वास गेली आहेत.

दादांच्या विशेष लक्षामुळे मावळातील पायाभूत सुविधा, आरोग्य, शिक्षण व दळणवळण क्षेत्रात मोठी प्रगती झाली. लोणावळा ग्लास स्काय वॉक, एकवीरा देवी रोपवे, संतभूमी कॉरिडॉर, भव्य क्रीडासंकुल यांसारखे काही महत्त्वाकांक्षी प्रकल्प प्रलंबित असले तरी, आतापर्यंत झालेला विकास मावळच्या भविष्यासाठी दिशादर्शक ठरत आहे.

## सारांश वृत्त

### झारखंडमध्ये ८ सायबर गुन्हेगारांना अटक

**देवघर :** झारखंडच्या देवघर जिल्ह्यात पोलिसांनी छापा टाकून आठ सायबर गुन्हेगारांना अटक केली आणि त्यांच्या ताब्यातून १४ मोबाईल फोन जप्त केले, असे एका अधिकाऱ्याने शुक्रवारी सांगितले. त्यांनी सांगितले की, गुरुवारी पलाजोरी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील लुसियो टेकडी परिसरातील एका निर्जन ठिकाणी छापा टाकण्यात आला. एका गटाने ग्राहक सेवा अधिकारी, बँक अधिकारी आणि सरकारी अधिकारी असल्याचे भासवून लोकांना फोन कॉलद्वारे फसवले जात असल्याची माहिती मिळाली होती.

### लखनौमध्ये २ कोटींचे हेरॉइन जप्त

**लखनौ :** सेंट्रल ब्युरो ऑफ नार्कोटिक्स (सीबीएन) ने २८० ग्रॅम हेरॉइन जप्त केले आहे, ज्याची बेकायदेशीर बाजारात किंमत अंदाजे १.९६ कोटी रुपये आहे आणि एका व्यक्तीला अटक केली आहे, असे एका अधिकाऱ्याने शुक्रवारी सांगितले. उप-नार्कोटिक्स आयुक्त (उत्तर प्रदेश युनिट) प्रवीण बाली यांनी पीटीआयला सांगितले की, बक्षी का तालब तहसीलमधील लखनौ-सीतापूर रोडवरील इटौंजा टोल प्लाझा येथे शुक्रवारी केलेल्या कारवाईदरम्यान ही जप्ती करण्यात आली. ही कारवाई विशिष्ट गुप्त माहितीच्या आधारे करण्यात आली.

### फेसबुकचा नफा ६४७ कोटी रुपयांचा

**नवी दिल्ली :** फेसबुक इंडियाने मार्च २०२५ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षात स्टँडअलोन नफ्यात सुमारे २८ टक्क्यांनी वाढ करून ६४७.४५ कोटी रुपये नफा मिळवला आहे, असे कंपनीच्या नियामक फाइलिंगमध्ये टॉफलरने शेअर केले आहे. कंपनीला गेल्या वर्षी ५०४.९३ कोटी रुपयांचा नफा झाला होता. आर्थिक वर्ष २०२५ मध्ये ऑपरेशन्समधून मिळणारा महसूल २५ टक्क्यांनी वाढून ३,७९२.९१ कोटी रुपये झाला, जो गेल्या वर्षी ३,०३४.८२ कोटी रुपये होता.

## भारत-युरोपीय महासंघ मुक्त व्यापार करारामुळे

# बांगलादेश-पाकसमोरील अडचणींत वाढ

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** भारत आणि युरोपियन युनियन यांच्यातील मुक्त व्यापार करारावर दशकांनंतर स्वाक्षऱ्या झाल्या असून, त्याचे पडसाद थेट दक्षिण आशियातील अर्थव्यवस्थांवर उमटू लागले आहेत. भारतासाठी हा करार जागतिक व्यापारात मोठी झेप ठरणारा असताना, बांगलादेश आणि पाकिस्तानसाठी मात्र तो गंभीर आव्हान ठरू शकतो.

बांगलादेशाची चिंता सर्वाधिक आहे, कारण त्याची अर्थव्यवस्था प्रामुख्याने वस्त्र उद्योगावर अवलंबून असून युरोपियन बाजारपेठ त्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. सध्या अल्प विकसित देश (एलडीसी) म्हणून बांगलादेशला युरोपीय महासंघामध्ये शून्य-कर सवलतीचा लाभ मिळतो. गेल्या पंधरा वर्षांत याच सवलतीचा फायदा घेत बांगलादेशने युरोपियन वस्त्र बाजारातील आपला वाटा लक्षणीयरीत्या वाढवला.

२०१० मध्ये युरोपियन युनियनच्या वस्त्र बाजारात चीनचा वाटा ४५ टक्के होता, जो २०२५ पर्यंत २८ टक्क्यांवर आला. या बदलाचा फायदा घेत बांगलादेशने आपला वाटा ७ टक्क्यांवरून २१ टक्क्यांपर्यंत नेला. याच काळात भारतीय वस्त्रांवर ९ ते १२ टक्के आणि पादत्राणांवर १७ टक्क्यांपर्यंत आयात शुल्क असल्याने भारताचा वाटा केवळ ५ टक्क्यांवर घसरला. मात्र, नोव्हेंबर २०२६ मध्ये बांगलादेश एलडीसी दर्जातून बाहेर पडणार असून, त्यानंतर त्याला मिळणाऱ्या सवलती संपुष्टात येतील. याउलट, एफटीएअंतर्गत भारताला युरोपीय महासंघामध्ये शून्य-ड्युटी प्रवेश मिळणार आहे. स्वतःचा कापूस, मजबूत वस्त्र उद्योग आणि संपूर्ण पुरवठा साखळी यामुळे भारत बांगलादेशापेक्षा अधिक स्पर्धात्मक ठरण्याची शक्यता आहे. विश्लेषणानुसार, या बदलामुळे बांगलादेशाच्या वस्त्र निर्यातीत सुमारे ५.७ अब्ज डॉलर्सची घट होऊ शकते.

पाकिस्तानलाही या कराराचा फटका बसण्याची चिन्हे आहेत. आतापर्यंत 'जीएसपी प्लस' दर्जामुळे पाकिस्तानला युरोपीय महासंघामध्ये शुल्कमुक्त प्रवेश मिळत होता, जो भारताला उपलब्ध नव्हता. तरीही पाकिस्तानची वस्त्र निर्यात भारतापेक्षा फारशी पुढे नव्हती. भारताला आता शून्य-शुल्क प्रवेश मिळाल्यानंतर पाकिस्तानचा उरलेला स्पर्धात्मक लाभही नष्ट होईल, अशी भीती तेथील उद्योग क्षेत्र व्यक्त करत आहे.

पाकिस्तानी तज्ज्ञांचे म्हणणे आहे की स्वस्त वीज, कमी वित्तपुरवठा खर्च आणि एकात्मिक पुरवठा साखळी यांमुळे भारताला मोठी आघाडी मिळते. शिवाय, जीएसपी प्लस टिकवण्यासाठी पाकिस्तानला मानवी हक्क आणि कामगार कायद्यांशी संबंधित २७ आंतरराष्ट्रीय करारांचे पालन करावे लागते, तर भारतावर एफटीएअंतर्गत अशा बंधनांचा ताण नाही.

भारताने २०३० पर्यंत वस्त्र निर्यात १०० अब्ज डॉलर्सपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. कच्च्या मालापासून तयार वस्तूपर्यंतची मजबूत क्षमता आणि अमेरिकेच्या परस्पर शुल्कांच्या पार्श्वभूमीवर युरोपियन बाजारपेठेकडे वळलेले लक्ष, ही भारताची ठोस रणनीती मानली जात आहे.

बांगलादेश आणि पाकिस्तानमधील व्यापारी संघटनांनी आपल्या सरकारांना 'निर्यात आणीबाणी' जाहीर करण्याचा सल्ला दिला आहे. धोरणांची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली आहे.

# अमेरिकाकडून क्युबावर आर्थिक दबावात वाढ

## तेल पुरवठा करणाऱ्या देशांवर कठोर कारवाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**न्यूयॉर्क :** अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी एका नवीन आदेशावर स्वाक्षरी केली आहे, ज्याद्वारे क्युबाला तेल पुरवठा करणाऱ्या देशांवर अतिरिक्त शुल्क लादण्याचा इशारा दिला गेला आहे. हा आदेश आंतरराष्ट्रीय आपत्कालीन आर्थिक शक्ती कायद्याअंतर्गत जारी करण्यात आला असून, अमेरिकेच्या राष्ट्रीय सुरक्षेसाठी क्युबाचे कम्युनिस्ट सरकार साधारणधोकादायक असल्याचे घोषित केले गेले आहे. अमेरिकेच्या आरोपानुसार, क्युबा रशिया, चीन आणि इराणसारख्या देशांशी सहकार्य करत आहे, तसेच हमास आणि हिजबुल्लाह यांसारख्या दहशतवादी गटांना पाठिंबा देत आहे. ट्रम्प यांनी ट्रुथ सोशलवर पोस्ट करत म्हटले, "आता तेल किंवा पैसा क्युबाला जाणार नाही – शून्य!"

या आदेशाचा परिणाम म्हणून मेक्सिकोने क्युबाला तेल पुरवठा तात्पुरता थांबवला आहे. मेक्सिकन राष्ट्राध्यक्ष क्लॉडिया शीनबॉम यांनी याबाबत सांगितले, "हा गरजेपोटी घेतलेला निर्णय आहे. आम्ही क्युबासोबत एकता राखू."

क्युबाला पुरवठा होणाऱ्या तेलाचे वितरण मागील वर्षभरात महत्त्वाचे होते. जानेवारी २०२५ मध्ये व्हेनेझुएला कडून होणारा पुरवठा पूर्णपणे बंद झाला आणि त्या वेळी क्युबाच्या एकूण तेल आयातीपैकी ४४% तेल मेक्सिको, ३३% व्हेनेझुएला आणि १०% रशिया पुरवत होते. पेमेक्स कंपनीने २०२५ च्या पहिल्या नऊ महिन्यांत दररोज सरासरी २०,००० बॅरल तेल क्युबाला पाठवले होते.

सध्या प्रमुख स्त्रोत बंद झाल्यामुळे क्युबातील इंधन संकट गंभीर झाले आहे, वीजपुरवठा खंडित झाला आहे, तसेच अन्न आणि पाणी पुरवठ्यातही व्यत्यय निर्माण झाला आहे.

# जग एका देशाच्या हुकूमाने चालू शकत नाही

## संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस गुटेरेस यांनी अमेरिकेला फटकारले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांनी गुरुवारी अमेरिका आणि अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर थेट, पण स्पष्ट शब्दांत टीका केली. जग एका देशाच्या किंवा एका शक्तीच्या हुकूमाने चालवता येत नाही आणि अशा पद्धतीने जागतिक समस्या सुटू शकत नाहीत, असे त्यांनी ठामपणे सांगितले. याचवेळी त्यांनी चीनलाही फटकारले आणि बहुध्रुवीय (मल्टिपोलर) जागतिक व्यवस्थेची गरज अधोरेखित केली. या संदर्भात त्यांनी अलीकडेच झालेल्या भारत-युरोपियन युनियन मुक्त व्यापार कराराचाही उल्लेख केला.

गुटेरेस हे त्यांच्या दहाव्या आणि अखेरच्या कार्यकाळाच्या सुरुवातीला पत्रकारांशी संवाद साधत होते. आपल्या कार्यकाळात अनेक युद्धे आणि संघर्ष पाहिलेल्या गुटेरेस यांनी बदलत्या जागतिक परिस्थितीबद्दल चिंता व्यक्त केली.

"एका शक्तीच्या हुकूमशाहीने जागतिक प्रश्न सुटणार नाहीत. तसेच दोन शक्तींनी जग दोन भागांत विभागले, तरी काही साध्य होणार नाही," असे म्हणत त्यांनी अमेरिका आणि चीनचा संदर्भ दिला. "सध्या जग दोन ध्रुवांत अडकले आहे—एक अमेरिका-केंद्रित आणि दुसरा चीन-केंद्रित. पण जर आपल्याला स्थिर, शांततापूर्ण, विकासाभिमुख आणि समतावादी जग हवे असेल, तर बहुध्रुवीयतेला पाठिंबा देणे आवश्यक आहे. भारत आणि युरोपियन युनियनमधील अलीकडील व्यापार करारासारख्या घडामोडी मी सकारात्मक दृष्टीने पाहतो," असेही ते म्हणाले.

अलीकडच्या काळात अनेक देशांनी अमेरिकेच्या वर्चस्वाविरोधात भूमिका घेतली आहे. ट्रम्प यांनी 'पीस कौन्सिल' स्थापन केल्यानंतर अवघ्या आठवड्याभरात गुटेरेस यांचे हे विधान आले आहे.

# गांधी हा विचार; तो नष्ट होऊ शकत नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त शुक्रवारी काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. बापू हे केवळ एक व्यक्तिमत्त्व नसून एक अमर विचार आहेत, जो कधीही पुसला जाऊ शकत नाही, कारण गांधी भारताच्या आत्म्यात कायमस्वरूपी जिवंत आहेत, असे राहुल गांधी यांनी सांगितले.

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी 'एक्स'वर पोस्ट करत म्हटले, "महात्मा गांधी हे व्यक्ती नाहीत, तर एक विचार आहेत. हा विचार कधी ब्रिटिश साम्राज्याने, कधी द्वेषाच्या विचारसरणीने, तर कधी अहंकारी सत्तेने नष्ट करण्याचा प्रयत्न केला; मात्र तो प्रयत्न अपयशी ठरला." त्यांनी पुढे नमूद केले की, गांधींनी देशाला स्वातंत्र्यासोबतच हे मूलमंत्र दिले की सत्तेच्या बळापेक्षा सत्याची ताकद मोठी असते आणि हिंसा व भीतीपेक्षा अहिंसा व धैर्य श्रेष्ठ असते. म्हणूनच हा विचार कधीही मिटू शकत नाही, असेही त्यांनी ठामपणे सांगितले.

दरम्यान, काँग्रेसचे महासचिव जयराम रमेश यांनीही गांधी पुण्यतिथीनिमित्त महत्त्वाचा संदर्भ मांडला. त्यांनी १९४८ मध्ये सरदार वल्लभभाई पटेल आणि श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्यात झालेल्या पत्रव्यवहाराचा उल्लेख केला. जयराम रमेश यांनी सांगितले की, गांधीहत्येच्या दोन दिवस आधी पंडित जवाहरलाल नेहरू यांनी श्यामा प्रसाद मुखर्जी यांना पत्र लिहिले होते, तर काही महिन्यांनंतर १८ जुलै १९४८ रोजी सरदार पटेल यांनीही त्यांना पत्र पाठवले होते. या दोन्ही पत्रांमध्ये स्वतःला राष्ट्रवादाचे रक्षक म्हणवणाऱ्या शक्तींवर गंभीर आरोप करण्यात आले होते, असे जयराम रमेश यांनी म्हटले. त्याच विचारसरणीशी संबंधित एका विद्यमान लोकसभा सदस्याने गांधी आणि गोडसे यांच्यात निवड करता येत नसल्याचे विधान केले, हे धक्कादायक असल्याचे त्यांनी सांगितले. यामुळे त्या मानसिकतेचे स्वरूप स्पष्ट होते, असा आरोपही त्यांनी केला.

३० जानेवारी १९४८ रोजी नथुराम गोडसेने नवी दिल्लीतील प्रार्थना सभेत महात्मा गांधी यांची गोळ्या झाडून हत्या केली होती. गांधींचा विचार आणि त्यांचे मूल्य आजही देशाच्या आत्म्यात जिवंत असल्याचा पुनरुच्चार काँग्रेस नेत्यांनी या निमित्ताने केला.

# केंद्रीय निरीक्षकांच्या यादीत बदलाची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता :** पश्चिम बंगाल सरकारने आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाला पत्र पाठवत केंद्रीय निरीक्षकांच्या यादीत बदल करण्याची मागणी केली आहे. आयोगाने निवडलेल्या १५ आयएएस अधिकाऱ्यांपैकी नऊ अधिकाऱ्यांच्या जागी पर्यायी नावे सुचवण्यात आल्याचे एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

या प्रस्तावित बदलांमध्ये राज्याचे गृहसचिव यांचाही समावेश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. प्रशासकीय आणि अधिकृत गरजांनुसार हा प्रस्ताव आयोगाकडे पाठवण्यात आला असल्याचेही अधिकाऱ्याने नमूद केले. "राज्य सरकारने गुरुवारी नऊ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्यात पर्यायी नावे निवडणूक आयोगाला पाठवली आहेत. या प्रस्तावाची छाननी करून आयोग अंतिम निर्णय घेईल," असे ते म्हणाले.

पश्चिम बंगालसह आसाम, केरळ, तामिळनाडू आणि पुद्दुचेरी या पाच राज्यांमध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकांसाठी केंद्रीय निरीक्षक म्हणून नियुक्तीसाठी निवडणूक आयोगाने अलीकडेच पश्चिम बंगालमधील २५ वरिष्ठ अधिकाऱ्यांची यादी जाहीर केली होती. या यादीत गृहसचिव जगदीश प्रसाद मीणा यांच्यासह १५ आयएएस आणि १० आयपीएस अधिकाऱ्यांचा समावेश आहे. तसेच हावडा आणि आसनसोलचे पोलीस आयुक्तही या यादीत आहेत.

याआधी निवडणूक आयोगाने स्पष्ट केले होते की, केंद्रीय निरीक्षकांच्या नियुक्तीसाठी त्यांनी राज्य सरकारकडून वारंवार अधिकाऱ्यांची नावे मागवली होती. ठरावीक कालावधीत कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने आयोगाने स्वतःहून यादी अंतिम करून जाहीर केली. आयोगाने मार्गदर्शक तत्त्वेही जारी केली असून, सर्व आयएएस आणि आयपीएस अधिकाऱ्यांसाठी अनिवार्य ब्रीफिंग सत्रे घेणे बंधनकारक करण्यात आले आहे.

## सर्वोच्च न्यायालयाकडून हत्येच्या आरोपीची निर्दोष मुक्तता

# पुष्टीशिवाय कबुलीजबाब पुरेसा नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** केवळ पुष्टी न झालेल्या कबुलीजबाबाच्या आधारे आरोपीला दोषी ठरवता येत नाही, असे स्पष्ट करत सर्वोच्च न्यायालयाने मेघालय उच्च न्यायालयाचा हत्येप्रकरणातील दोषसिद्धीचा आदेश रद्द केला आहे. यासोबतच न्यायालयाने कनिष्ठ न्यायालयाचा निर्दोष मुक्ततेचा निर्णय कायम ठेवत आरोपी बर्नार्ड लिंगडोह फावा यांची सुटका केली.

न्यायमूर्ती संजय कुमार आणि न्यायमूर्ती के. विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने फावा यांनी दाखल केलेली फौजदारी अपील मंजूर करताना नमूद केले की, "पुष्टीशिवाय दिलेला कबुलीजबाब हा दोषी ठरवण्यासाठी पुरेसा ठरत नाही. आरोपीला दोषी ठरवण्यासारखी एकही ठोस परिस्थिती उपलब्ध नाही."

अपीलकर्त्यांच्या वतीने वकील अजय सभरवाल यांनी युक्तिवाद केला की, स्वतंत्र आणि विश्वासार्ह पुराव्यांच्या अभावात कथित कबुलीजबाबांवर आधारित दोषसिद्धी कायदेशीर ठरू शकत नाही. त्यांनी 'शेवटचे पाहिले' (लास्ट सीन थेअरी) या सिद्धांताला पाठिंबा देणारे कोणतेही ठोस पुरावे नसल्याचे, तसेच जप्ती व जप्त माल कायदेशीररीत्या सिद्ध न झाल्याचेही अधोरेखित केले. कबुलीजबाब विसंगत, मागे घेतलेले किंवा अविश्वसनीय असल्याचेही त्यांनी सांगितले.

या युक्तिवादांशी सहमती दर्शवत सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, कथित कबुलीजबाब स्वतंत्र पुष्टीशिवाय दोषसिद्धीचा आधार ठरू शकत नाही. तसेच 'शेवटचे पाहिले' सिद्धांत, जप्ती आणि इतर परिस्थितीजन्य पुराव्यांमध्येही विश्वासार्हतेचा अभाव असल्याचे न्यायालयाने नमूद केले. याआधी उच्च न्यायालयाने कनिष्ठ न्यायालयाचा निर्दोष मुक्ततेचा निर्णय रद्द करून आरोपींना खून व पुरावे नष्ट केल्याप्रकरणी दोषी ठरवले होते. त्या निर्णयाला आव्हान देत फावा यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती.

हे प्रकरण २००६ सालचे असून, मेघालयातील एका महाविद्यालयीन विद्यार्थ्याच्या बेपत्ता होण्याची तक्रार नोंदवण्यात आली होती. नंतर त्याचा मृतदेह स्मशानभूमीत पुरलेला आढळून आला. पोलिसांनी मृत विद्यार्थ्याच्या दोन मित्रांना अटक केली होती. शवविच्छेदन अहवालात मृत्यूचे कारण हवेचा अभाव असल्याचे नमूद करण्यात आले असले, तरी तपास करणाऱ्या डॉक्टरांनी गळफास घेऊन आत्महत्या झाल्याची शक्यता नाकारता येत नसल्याचे मान्य केले होते. सर्व पुराव्यांचा सखोल आढावा घेत सर्वोच्च न्यायालयाने तपासात गंभीर त्रुटी असल्याचे नमूद केले आणि अवलंबून असलेले पुरावे अविश्वसनीय असल्याचा निष्कर्ष काढत दोन्ही आरोपींची निर्दोष मुक्तता करत त्यांची तात्काळ सुटका करण्याचे आदेश दिले.

# शेख हसीनांच्या वक्तव्यानंतर बांगलादेश संतप्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ढाका :** बांगलादेशाच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांनी नवी दिल्लीत दिलेल्या भाषणानंतर बांगलादेश सरकारने भाराताविरोधात आणखी एक मोठा निर्णय घेतला आहे. बांगलादेशने चट्टोग्राममधील मिरसराई येथील भारतीय आर्थिक क्षेत्र प्रकल्प अधिकृतपणे रद्द केला आहे. या निर्णयामुळे भारत-बांगलादेश संबंधांमध्ये नव्या तणावाची शक्यता निर्माण झाली आहे.

मुख्य सल्लागार मोहम्मद युनूस यांच्या अध्यक्षतेखाली बांगलादेश आर्थिक क्षेत्र प्राधिकरण मंडळाची उच्चस्तरीय बैठक पार पडली. तसेच बांगलादेश गुंतवणूक विकास प्राधिकरणाकडून सूचनाही घेण्यात आल्या. या बैठकीनंतर भारतीय आर्थिक क्षेत्र प्रकल्प रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

सरकारने स्पष्ट केले आहे की, या प्रकल्पासाठी देण्यात आलेली जमीन आता देशांतर्गत लष्करी उत्पादनाला चालना देण्यासाठी संरक्षण औद्योगिक क्षेत्र विकसित करण्यासाठी वापरण्यात येणार आहे. अधिकाऱ्यांच्या मते, शेख हसीना यांनी दिल्लीत माध्यमांशी संवाद साधताना केलेल्या आभासी भाषणाच्या पार्श्वभूमीवरच हा निर्णय घेण्यात आला. भारत-बांगलादेश आर्थिक सहकार्याचे प्रतीक म्हणून भारतीय आर्थिक क्षेत्राकडे पाहिले जात होते. २०१५ मध्ये झालेल्या सामंजस्य करारानुसार, मिरसराई (चट्टोग्राम) येथे शेकडो एकर आणि बागेरहाटमधील मंगला येथे आणखी एक क्षेत्र विकसित करण्याची योजना होती. भारताने या प्रकल्पासाठी सवलतीच्या दरात कर्जही दिले होते.

या प्रकल्पाचा उद्देश दोन्ही देशांमधील औद्योगिक सहकार्य वाढवणे, आर्थिक एकात्मता मजबूत करणे आणि बांगलादेशमध्ये मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती करणे हा होता. मात्र, युनूस सरकारने असा दावा केला आहे की आंतरराष्ट्रीय निविदा आणि काम वेगाने सुरू करण्यासाठी वारंवार विनंत्या करूनही प्रत्यक्षात कोणतीही लक्षणीय प्रगती झाली नाही. भारतीय आर्थिक क्षेत्र प्रकल्पामुळे बांगलादेशमध्ये मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होईल, अशी अपेक्षा होती. मात्र प्रकल्प रद्द झाल्याने या आशांवर पाणी फिरले आहे.

# पीटी उषाचे पती व्ही. श्रीनिवासन यांचे निधन

**कोझिकोडे :** भारतीय ऑलिंपिक असोसिएशनच्या अध्यक्षा आणि राज्यसभा खासदार पीटी उषा यांचे पती व्ही. श्रीनिवासन यांचे शुक्रवारी पहाटे निधन झाले, अशी माहिती कुटुंबीयांनी दिली. ते ६७ वर्षांचे होते. आज सकाळी श्रीनिवासन आपल्या राहत्या घरी अचानक कोसळले. त्यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. माजी केंद्रीय सरकारी कर्मचारी असलेले श्रीनिवासन उषा यांच्या कारकिर्दीत नेहमीच त्यांच्यासोबत उभे राहिले.

# शशी थरूर यांनी स्पष्ट केली आपली भूमिका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** ज्येष्ठ काँग्रेस नेते शशी थरूर यांनी शुक्रवारी स्पष्ट केले की काही आंतरराष्ट्रीय मुद्द्यांवरील त्यांचे विचार चुकीच्या पद्धतीने भाजप समर्थक म्हणून समजले जाऊ नयेत. थरूर म्हणाले की ते सरकार किंवा भारत समर्थक असण्यापेक्षा देशाच्या हितासाठी बोलणे पसंत करतात. "मी नेहमीच म्हटले आहे की काही आंतरराष्ट्रीय विषयांवर राजकारण करण्याऐवजी राष्ट्रीय हितासाठी बोलणे महत्त्वाचे आहे," असे त्यांनी सांगितले.


पहलगाम हल्ल्यानंतर भारत-पाकिस्तान संबंधांवरील त्यांच्या भाष्यावर झालेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर ही स्पष्टता दिली गेली. काँग्रेसच्या अधिकृत भूमिकेपेक्षा वेगळी असल्यामुळे काही पक्ष नेत्यांनी टीका केली होती, पण थरूर यांनी पक्षाच्या मार्गाचे पालन करत असल्याचे सांगितले.

थरूर यांनी सांगितले की, "मी काँग्रेसमध्ये आहे आणि कुठेही जाणार नाही. मी केरळ निवडणूक मोहिमेत यूडीएफच्या विजयासाठी काम करेन." गुरुवारी त्यांनी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आणि राहुल गांधी यांची भेट घेतली आणि सांगितले की सर्व काही ठीक आहे. ही बैठक केरळ विधानसभा निवडणुकीच्या महत्त्वाच्या टप्प्यावर झाली, जिथे यूडीएफ दशकभर विरोधी पक्षात राहिल्यानंतर सत्ता परत मिळवण्याचे लक्ष्य ठेवले आहे.

## आर्थिक सर्वेक्षणातील तपशील प्रसिद्ध; प्रगतीसोबत आव्हानेही अधोरेखित

# शिक्षणातील गुणवत्ता, आरोग्यात प्रगती; शहरीकरणाचे आव्हान

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** आर्थिक सर्वेक्षण हे भारताच्या अर्थव्यवस्थेची दिशा समजून घेण्यासाठी महत्त्वाचे दस्तऐवज मानले जाते. यामध्ये शिक्षण, आरोग्य आणि शहरीकरण यांसारख्या आर्थिक व सामाजिक क्षेत्रांबाबत सविस्तर माहिती देण्यात आली असून, काही सकारात्मक प्रगतीसोबतच गंभीर आव्हानेही अधोरेखित करण्यात आली आहेत.

सर्वेक्षणानुसार प्राथमिक स्तरावर शाळांमध्ये प्रवेश जवळपास सार्वत्रिक झाला असला, तरी शिकण्याच्या गुणवत्तेबाबत चिंता कायम आहे. राष्ट्रीय मूल्यांकनातून असे स्पष्ट झाले आहे की उच्च प्राथमिक वर्गातील अनेक विद्यार्थी साधे वाचन किंवा मूलभूत गणितही करू शकत नाहीत. ही तफावत ग्रामीण भागातील आणि उपेक्षित समुदायांतील विद्यार्थ्यांमध्ये अधिक ठळक आहे. त्यामुळे मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान सुधारणे हे सर्वात मोठे आव्हान असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

जगातील संबंधित वयोगटातील सुमारे २७ टक्के लोकसंख्या भारतात असतानाही, शालेय शिक्षणाची अपेक्षित वर्षे केवळ १३ इतकी आहेत, जी चीन, जपान, इंडोनेशिया, जर्मनी आणि अमेरिकेपेक्षा कमी आहेत.

एका अहवालानुसार, २०२४-२५ नुसार, देशात २४.६९ कोटी विद्यार्थी, १४.७१ लाख शाळा आणि १.०१ कोटींहून अधिक शिक्षक आहेत. सरकारी शाळा एकूण शाळांपैकी ६९ टक्के असून त्यामध्ये जवळपास निम्मे विद्यार्थी शिकतात, तर खासगी शाळांमध्ये २६ टक्के शाळा असून ४१ टक्के विद्यार्थी आहेत. राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार, माध्यमिक टप्प्यावर निव्वळ नोंदणी प्रमाण केवळ ५२.२ टक्के आहे, ज्यामुळे आठवीनंतर मोठ्या प्रमाणात शाळा सोडण्याचे चित्र समोर येते.

परख राष्ट्रीय सर्वेक्षण २०२४ च्या निष्कर्षांनुसार, कोविड-१९ नंतर विशेषतः तिसरीच्या स्तरावर शिकण्याच्या पातळीत सुधारणा झाली आहे. गणितातील प्रावीण्य ४२ टक्क्यांवरून ६५ टक्क्यांपर्यंत, तर भाषेतील प्रावीण्य ३९ टक्क्यांवरून ५७ टक्क्यांपर्यंत वाढले आहे. मात्र १४ ते १८ वयोगटातील जवळपास २ कोटी किशोरवयीन मुले शाळेबाहेर असल्याची समस्या अजूनही गंभीर आहे.

आरोग्य क्षेत्रात दीर्घकालीन सुधारणा दिसून येत आहेत. माता मृत्युदर आणि पाच वर्षांखालील बालमृत्यूमध्ये लक्षणीय घट झाली असून, सरासरी आयुर्मान ७० वर्षांहून अधिक झाले आहे. डिजिटल आरोग्य उपक्रम आणि विमा योजनांमुळे सेवा सुधारल्या असल्या, तरी वाढते असंसर्गजन्य आजार आणि लठ्ठपणा ही नवी आव्हाने ठरत आहेत.

सर्वेक्षणात शहरीकरणालाही गंभीर आव्हान म्हणून ओळखले आहे. देशाच्या उत्पादनात शहरांचा मोठा वाटा असला, तरी महानगरपालिकांकडे पुरेशी आर्थिक ताकद नाही. कमी महसुलामुळे गृहनिर्माण, वाहतूक, स्वच्छता आणि हवामान बदलास अनुरूप पायाभूत सुविधांवरील खर्च मर्यादित राहतो, अशी स्पष्ट नोंद करण्यात आली आहे. एकूणच, आर्थिक सर्वेक्षणातून भारताने काही क्षेत्रांत लक्षणीय प्रगती केली असली, तरी शिक्षणातील गुणवत्ता, किशोरवयीन गळती आणि शहरी व्यवस्थापन ही भविष्यातील मोठी आव्हाने असल्याचे स्पष्ट होते.